मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया (मराठी)

अंक ६ • वर्ष १५ वे • पृष्ठे ५२ • जून - २०१८



# हसती दुनिया (मराठी)

बालकांच्या बौध्दिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट

अंक ६ • वर्ष १५ वे • पृष्ठे ५२ • जून २०१८

| संपादक | सहसंपादक |
|---|---|
| राजेंद्र थोरात | सुरेश तिर्लोटकर |

सजावट व चित्रे

उदय सत्यवान पांगे   राजनंदन पिंपळकर

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका एम.पी.प्रिंटर्स, बी-२२०, फेज-II, नोएडा-२०१३०५, जिल्हा-गौतम बुध्द नगर (उत्तर प्रदेश) येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई -४०० ०१४. येथे प्रकाशित केली.

कार्यालयाचा पत्ता

५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४

ई-मेल

marathihastiduniya@gmail.com

Website : www.nirankari.org

| वर्गणी | १ वर्ष | ५ वर्षे |
|---|---|---|
| भारत/ नेपाळ | रु. १५०/- | रु. ७००/- |
| यु.के. | £ 15 | £ 80 |
| युरोप | € 20 | € 100 |
| अमेरिका | $ 25 | $ 120 |
| कनाडा/ ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 140 |

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९








## कथा


- रावणाचा उन्मत्तपणा ०६
- परमेश्वर दयाळू आहे ०८
- ज्ञान आणि अहंकार १४
- वेड्याचे शहाणपण ३१
- डायरीने स्वभाव बदलला ४२
- फुलांचं भांडण ४४
- शेरास सव्वाशेर ४८

## स्तंभ


- दोन शब्द ०४
- शब्दकोडे १०
- दादाला विचारु या ११
- विचारपुष्प १२
- आरोग्याचा मंत्र २४
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे २८
- दिव्यवाणी ३०
- हसा मुलांनो हसा ३२
- सामान्य ज्ञान ४६
- चित्र काढा आणि रंग भरा ५०


## विशेष व प्रेरक प्रसंग


- गो.नी. दांडेकर ०५
- तेजस्विनी -७४ २०
- दुर्गभ्रमंती २२
- 'बूटा' मिशनचा २९
- समर्थ दर्शन -४४ ३४
- आपले जिल्हे ४०
- पक्षीजगत ४७





## चित्रकथा


- आजोबा १६
- किट्टी ३६








## कविता


- प्राण्यांची शाळा २१
- आला आला पाऊस आला ४१
- आकाश दाटले मेघांनी ४३

# पर्यावरणरक्षण - एक जबाबदारी

मित्रांनो, हल्ली उन्हाळा अनेक उच्चांक गाठत आहे. जगातील सर्वाधिक तापमानाची नोंदही महाराष्ट्राच्या वाट्याला आलेली तुम्ही पाहिली. यामागचं कारण सारेच जाणतात. 'ग्लोबल वार्मिंग' हा शब्द मागील काही वर्षांपासून सतत कानावरही पडत आहे. पर्यावरणाचं संतुलन ज्यावेळी बिघडतं तेव्हा पृथ्वीवर नैसर्गिक आपत्ती ओढवते. आपल्या धरतीला सुजलाम्-सुफलाम् करण्यासाठी अनेक संस्था, सामाजिक कार्यकर्ते, सिनेकलाकार आपापल्या परीने प्रयत्न करत आहेत. कुणी पाणी अडवा-पाणी जिरवा ही योजना राबवत आहे, तर कुणी तलाव-विहिरी खोदण्याचं काम करत आहे. काही संस्था वृक्षारोपण करुन आपलं योगदान देत आहेत. सरकारतर्फे ५ जून हा दिवस 'पर्यावरण दिन' म्हणूनही साजरा केला जात आहे.

निसर्गानं मानवाला भरभरुन दिलं; पण माणसानं त्याची कदर केली नाही. नैसर्गिक साधनसंपत्तीची हेळसांडही केली आणि प्रदूषणही वाढवलं. शुध्द हवा आणि पाणी या जीवनावश्यक बाबी दुर्मीळ होऊ लागल्या. प्राणिजीवन धोक्यात येऊ लागलं. आता निसर्गाचा हा समतोल आपणच सावरायला हवा. येणाऱ्या पीढीच्या संवर्धनासाठी, ईश्वराचे व निसर्गाचे उतराई होण्यासाठी, निसर्गाप्रती कृतज्ञ राहण्यासाठी प्रत्येकानं कंबर कसली पाहिजे. त्यासाठी काही नियम स्वतःला लागू करायचे आहेत. प्रथमतः नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर काटकसरीने करावा, आवश्यक तेवढेच पाणी वापरावे, इतस्ततः कचरा टाकू नये, स्वच्छता राखावी, प्लास्टिकचा आणि थर्माकोलचा वापर कसोशीने टाळावा. दरवर्षी किमान एक तरी झाड लावून ते वाढवावे. अशा छोट्या-छोट्या सवयी प्रत्येकाच्या अंगी बाणल्या, तर पर्यावरणाच्या रक्षणासाठी केवढा तरी हातभार लागू शकेल. ज्या समाजात आपण राहतो, त्या समाजाचेही आपण देणे लागतो.

आज संत निरंकारी मिशन सामाजिक जाणिवेच्या दृष्टिकोनातून स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, रक्तदान, मरणोत्तर नेत्रदान इ. अभियान राबवून आपले कर्तव्य निभावत आहे. सद्‌गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराजांच्या जन्मदिनानिमित्त देशभरातील रेल्वे स्टेशन्स, रुग्णालये धुवून स्वच्छ केली जातात. जगभर वृक्षारोपण केले जाते. जेणेकरुन प्रदूषण कमी व्हावे. कारण बाबाजींची शिकवणच आहे, की प्रदूषण आतील (म्हणजे मनामनातील) असो किंवा बाहेरील ते नेहमी हानिकारकच असतं. म्हणून सेवा-सत्संगाच्या माध्यमातून मनाचं प्रदूषण थांबवण्याचा हा प्रयासही निरंतर सुरुच आहे. यासाठी मात्र प्रत्येकाच्या योगदानाची गरज आहे. एका पत्रकाराने बाबाजींना विचारले, की जगात बेजबाबदारपणा, अनाचार, भ्रष्टाचार बोकाळला आहे. लोकांना शिस्त, सदाचार या गोष्टींचं काहीही सोयरसुतक नाही. मग तुमच्या प्रयत्नाने असा काय फरक पडणार आहे? त्यावेळी बाबाजींनी उत्तरादाखल एक शेर म्हटला -

माना कि धरती को गुले गुलजार कर न सके हम।
मगर कुछ खार तो कम कर गये, जहां से गुजरे हम।

- राजेंद्र थोरात..

# गो. नी. दांडेकर

गोपाळ नीळकंठ दांडेकर तथा गो.नी.दांडेकर ह्यांचा जन्म परतवाडा (विदर्भ) येथे ८ जुलै १९१६ रोजी झाला. त्यांचे वडील शिक्षक होते. वयाच्या १२ व्या वर्षी गोनीदांनी (गो.नी. दांडेकर) स्वातंत्र्यलढ्यात भाग घेण्यासाठी पलायन केले. त्यासाठी त्यांनी सातव्या इयत्तेमध्ये शाळा सोडली. गोनीदां संत गाडगे महाराजांच्या सहवासात आले. इतकेच नाही तर गाडगेमहाराजांचा संदेश पोचवण्यासाठी ते गावोगाव हिंडले. नंतर गोनीदांनी वेदांताचा अभ्यास करणे सुरु केले. पुढे ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते बनले. १९४७ मध्ये गोनीदांनी लेखनकार्यावर जीवितार्थ चालविण्याचा निर्णय घेतला आणि त्यांनी पुढील आयुष्यात कुमार साहित्य, ललित गद्द, चरित्र, कादंबरी, आत्मचरित्र, प्रवासवर्णन, धार्मिक, पौराणिक इ. विविध प्रकारचे लेखन केले.

गोनीदांच्या कादंबरी वाचनाचा सार्वजनिक कार्यक्रम वर्षातून अनेकदा होतो. या उपक्रमाची सुरुवात १९७५ मध्ये प्रत्यक्ष गोनीदांनी केली. संत ज्ञानेश्वरांच्या सातव्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांनी सर्वप्रथम 'मोगरा फुलला' या कादंबरीचे अभिवाचन केले होते. त्यामध्ये त्यांची कन्या डॉ. वीणा देव, जावई डॉ. विजय देव हे सहभागी झाले होते. कादंबरीतील कथानाट्य वाचनातून लोकांपुढे उभे करण्याच्या या अभिनव प्रयोगाचे त्यावेळी सर्वत्र स्वागत झाले होते.

यानंतर गोनीदांच्या कुटुंबियांनी या अभिवाचनाची एक चळवळच उभी केली. मोगरा फुलला च्या पाठोपाठ मग शितू, पडघवली, मृण्मयी, पवनाकाठचा धोंडी, वाघरु, जैत रे जैत, देवकीनंदन गोपाला अशा अनेक कलाकृती या अभिवाचन संस्कृतीतून वाचकांना भेटू लागल्या. गोनीदा हयात असताना सुरु झालेला हा उपक्रम त्यांच्या पश्चातही या कुटुंबाने अखंडपणे सुरु ठेवला. त्यांच्या या उपक्रमात पुढे देव कुटुंबियांचे जावई रुचिर कुलकर्णी हे देखील सहभागी झाले.

गोनीदांनी पन्नास वर्षे दुर्गभ्रमण केले. या काळात त्यांनी गडाकोटांची, त्यावरील वास्तूंची असंख्य छायचित्रे काढली. त्यापैकी निवडक अशा ११५ कृष्णधवल छायचित्रांचे एक पुस्तक गोनीदांची दुर्गचित्रे या नावाने प्रकाशित झाले आहे. हे दुर्गप्रेम त्यांनी परोपरीने जागवले. त्यांनी स्वत: जन्मभर दुर्गभ्रमंती केलीच पण दुर्गदर्शन, दुर्गभ्रमणगाथा ह्या आपल्या पुस्तकांमधून त्यांनी दुर्गभ्रमंतीचे अनुभव शब्दबध्द केले. मराठीतील ललित साहित्यात त्यांचे हे लेखन अगदी वैशिष्ट्यपूर्ण आहे. या लेखनामुळे हजारो माणसे दुर्गभ्रमंतीकडे आकर्षित झाली.

केंद्र शासनाचा उत्कृष्ट चित्रपट कथा पुरस्कार तसेच महाराष्ट्र शासनाच्या अनेक पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले.

असा हा महान साहित्यिक १ जून १९९८ रोजी पुणे येथे काळाच्या पडद्याआड गेला. आज त्यांचा हा वारसा त्यांची मुलगी वीणा देव, जावई विजय देव आपल्या लेखणीच्या माध्यमातून चालवत आहेत. त्यांची नात मधुरा देव हीसुध्दा ललित लेखन करते तर दुसरी नात मृणाल देव-कुलकर्णी ही विख्यात अभिनेत्री आहे.



पौराणिक कथा

# रावणाचा उन्मत्तपणा

रावणाचा रथ रसातळाच्या दिशेने निघाला. वाटेत त्याची निवातकवच नावाच्या दैत्याशी गाठ पडली. दोघांनीही परस्परांना युध्दाचे आव्हान दिले; परंतु दोघेही समबल आहात, कोणी कोणावर मात करु शकणार नाही किंवा दोघेही परस्परांना मारु शकणार नाही, याची जाणीव त्यांना ब्रह्मदेवाने दिली व दोघांत मिलाफ घडवून आणला.

आता तर रावणाला उन्माद चढला होता. त्याने कातकेय नावाच्या दैत्याचा वध केला. आपला मेहुणा शूर्पणखेचा पती विद्दुज्जिव्हा यालाही त्याने तलवारीने कापून काढले. रावण मग वरुणाच्या दिव्य निवासापाशी पोहोचला. तेथे सुरभि गाय त्याने पाहिली. सुरभिच्या स्तनातून अखंडपणे वाहणाऱ्या दुधाने क्षीरसागर भरलेला आहे, अशी संकल्पना आहे. रावणाने भक्तीपूर्वक सुरभि गायीला प्रदक्षिणा घालून तिला वंदन केले. वरुणाच्या पुत्रांशी रावणाचा भयंकर संग्राम झाला व वरुणपुत्रांना रावणाने पराभूत केले. रावणाने वरुणाला युध्दासाठी आव्हान दिले; परंतु जलस्वामी वरुण संगीत ऐकण्यासाठी ब्रह्मलोकी निघून गेल्याचे त्याला कळले.

अनेक रुपवती कन्या, स्त्रिया यांना रावणाने अपहरण करुन डांबून ठेवले. त्या दु:खाने विलाप व आक्रोश करीत होत्या. माता, पिता,

बंधू, पती तर कुणाचा तान्हुला बाळ यापासून ताटातूट झाल्यामुळे त्या अबला शोकसागरात बुडून गेल्या होत्या.

'हा निशाचर स्त्रियांची वाताहत करताना क्रौर्याची सीमा गाठतो, तर स्त्रीच्या कारणानेच या दुर्बुध्दी राक्षसाचा वध होईल!' असा शाप या दु:खी स्त्रिया तळतळाट करीत रावणाला देत होत्या. एकाएकी रावणाची बहीण शूर्पणखा रावणासमोर येऊन कोसळली व रडू लागली. रावणाने तिला बोलते केले, तेव्हा ती म्हणाली, "राक्षसराज, तू मला बलपूर्वक विधवा केलंस. तू माझा थोरला भाऊ म्हणजे माझ्या पित्यासारखा. म्हणजे तू आपल्या मेहुण्याचा नव्हे, तर जावयाचा वध केलास."

तिचे सांत्वन करीत रावण मधुर वाणीने म्हणाले, "मुली, आता रडणं व्यर्थ आहे. युध्दकालात माझं चित्त ठिकाणावर नव्हतं. मला विजयाचा उन्माद चढला होता. आपला-परका याचं भान मला राहिलं नाही व तुझा पती माझ्या हातून मारला गेला. आता तू आपला मावसबंधू खर राक्षस याच्या आश्रयाने राहा. तो तुला काही कमी पडू देणार नाही. दंडकारण्याचे राज्य मी खराच्या स्वाधीन करीत आहे." अशाप्रकारे रावणाच्या आज्ञेने खर राक्षस दंडकारण्याचा अधिपती झाला व त्याच्या आश्रयाने शूर्पणखाही दंडकवनात राहू लागली.

अनेक युध्दे करुन थकलेला रावण लंकेजवळ निकुंभिला नावाच्या एका उत्तम उपवनात पोहोचला. तेथे त्याने पाहिले की, त्याचा पुत्र मेघनाद मोठ्या यज्ञात गुंतला आहे. मेघनादने काळे मृगचर्म, कमंडलू, शिखा आणि ध्वज धारण केला आहे. रावणाने कुतूहलापोटी त्याविषयी चौकशी केली. तेव्हा मौनव्रत धारण केल्यामुळे मेघनाद काही बोलू शकला नाही, परंतु यज्ञ पुरोहित शुक्राचार्य खुलासा करीत म्हणाले, "राजन, तुमचा पुत्र मेघनाद याने सहा यज्ञ पूर्ण केले. आता सातव्या माहेश्वरयज्ञाच्या परिपूर्तीने त्याला पशुपती शंकराकडून अनेक वर प्राप्त झाले. त्यानुसार इच्छेप्रमाणे चालणारा एक दिव्य आकाशरथ त्याला मिळाला. तामसी नावाची माया त्याला प्राप्त झाली. या मायेने अंधार निर्माण करता येतो व अदृश्य होता येते. दोन अक्षय्य बाणभाते, अतुट धनुष्य यांची त्याला प्राप्ती झाली." रावणाने हृदयालिंगन देऊन आपल्या प्रिय पुत्राचे कौतुक केले.

❍ क्रमशः

## पारख

मिठाईची पारख त्याचा आकार बघून होऊ शकत नाही. त्याची पारख त्यामधील गोडव्याने होते. त्याचप्रमाणे संत-महात्म्यांची पारख त्यांच्या जीवनावरुन, त्यांच्या कर्मावरुन होते.

## समदृष्टी

गुरुची दृष्टी ही समदृष्टीची असते. ती फक्त गुणच पाहते. म्हणून जे गुरसिख कोणाचे अवगुण न पाहता केवळ गुणच पाहतात व गुणच ग्रहण करतात, कुणालाही कमी लेखत नाही अशा गुरसिखाला गुरु शिरोधार्य स्थान देतो.

**- बाबा हरदेवसिंहजी महाराज**



कथा

# परमेश्वर दयाळू आहे

एका राजाची विशाल बाग होती. त्यात वेगवेगळया प्रकारची फळं होती. त्या सर्व बागेची देखरेख एक शेतकरी आपल्या परिवारासह करत होता. तो शेतकरी प्रत्येक दिवशी बागेतली ताजी फळं घेऊन राजाच्या महालात जात असे.

एके दिवशी शेतकऱ्याने बघितले, की झाडावर नारळ, पेरु, डाळिंब आणि द्राक्ष पिकून तयार आहेत. तो विचार करु लागला की कोणते फळ महाराजांना आज अर्पण करावे? खूप विचार केल्यानंतर त्याने ठरवले, की आज महाराजांना द्राक्षं देऊ या. त्याने द्राक्षांची टोपली भरली आणि राजाला देण्यासाठी निघाला. शेतकरी राजमहालात पोहचला. राजा आपल्याच विचारात हरवला होता आणि उदासही वाटत होता. नेहमीप्रमाणे शेतकऱ्याने द्राक्षांची टोपली राजाच्या समोर ठेवली आणि तो थोडया अंतरावर जाऊन बसला. राजा विचार करत

करत टोपलीमधले एक द्राक्ष उचलून खाई आणि दुसऱ्यांदा उचलेले द्राक्ष शेतकऱ्याच्या कपाळावर किंवा शरीराच्या अन्य भागावर निशाणा लावून मारत असे. राजाने फेकलेले द्राक्ष जेव्हा जेव्हा शेतकऱ्याला लागे, तेव्हा तेव्हा शेतकऱ्याच्या मुखातून शब्द येत, की 'परमेश्वर दयाळू आहे.'

थोडया वेळाने राजाला जाणीव झाली, की मी काय करतो आहे? आणि प्रतिउत्तर काय येत आहे? राजाने स्वत:ला सांभाळत शेतकऱ्याला विचारले, मी तुला सारखं द्राक्ष फेकून मारतो आहे आणि तुला ती लागतही आहेत, तरीही तू एकच वाक्य म्हणतो आहेस, की परमेश्वर दयाळू आहे. असे का? शेतकऱ्याने नम्रतेने उत्तर दिले, महाराज बागेत आज नारळ, पेरु, डाळिंब तयार होते; आज मला वाटलं की तुमच्यासाठी द्राक्ष घेऊन जावीत; पण आज जर मी द्राक्षांच्या जागी नारळ, डाळिंब किंवा मोठ मोठे पेरु आणले असते तर माझी अवस्था काय झाली असती? म्हणूनच मी म्हणत होतो, की परमेश्वर दयाळू आहे.

सांगण्याचा भावार्थ, याचप्रमाणे परमेश्वरही आपल्या कठीण प्रसंगाना हलकं करुन आपल्याला सावरत असतो; परंतु आपण परमेश्वराला कधीही धन्यवाद देत नाही. उलट परमेश्वरालाच दोष देतो, की माझ्या बाबतीत असे का झाले?, माझी काय चूक?

मित्रांनो, आज जे फळ आपल्याला मिळत आहे ते आपण पेरलेल्या कर्माच्या बी चे आहे. बाभळाच्या झाडाचे बी पेरल्यावर आंबा नाही येणार. तरीही जर बाभळीचे बी पेरले आणि आंबा नाही मिळाला त्याला जबाबदार आम्हीच आहोत; परंतु आपण तो दोष अन्य कोणावर तरी ढकलून देतो किंवा कोणी नाहीच मिळालं, तर परमेश्वर आहेच. आज आपल्याकडे जे काही आहे, त्या योग्यतेचे आपण नसूनही परमेश्वराने आवश्यकतेपेक्षा अधिक दिले आहे. मग आपण दोष देण्याऐवजी धन्यवाद द्यावेत. परमेश्वराची आपण लेकरं आहोत. तो कधीही आपलं वाईट चिंतीत नाही. सदैव कृपादृष्टीचा वर्षाव करत असतो. एकदा जरी परमेश्वराने दिलेल्या वस्तुंकडे बघितले तरी पूर्ण आयुष्यही परमेश्वराला धन्यवाद देण्यास कमी पडेल.

❑❑❑

## सुख

सतत दातार प्रभुचे स्मरण करा. संतांचा सत्कार करा. महापुरुषांची सेवा करा. असे होऊ नये, की आपण इतरांचे अवगुणच पाहायचे. आपण गुणांचे ग्राहक बनायचे आहे व प्रेम नम्रता या गुणांनी युक्त होऊन हा सत्याचा आवाज संपूर्ण विश्वामध्ये पोहोचवायचा आहे.

## भावना

समाधान, सहनशीलता, प्रेम, मिलवर्तन या भावना एकत्वामुळेच आहेत. द्वेष, प्रलोभन, वैरभाव या गोष्टी धरतीला भारभूत आहेत. आपल्याला समाधान देतील अशा भावना धारण करायच्या आहेत.

**- बाबा हरदेवसिंहजी महाराज**

# शब्दकोडे

## १६७

❍ विकास अरोडा (रेवाडी-हरियाणा)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | | ५ |
| | ६ | | | | | |
| ७ | | | ८ | | | |
| | | ९ | | | | |
| | | १० | | | | ११ |
| १२ | | | | १३ | | |
| | | १४ | | | | |
| १५ | | | | १६ | | |

## आडवे शब्द

१. रामायणातील भरत हा लव-कुश यांचा नात्याने ........... होता.

३. हिंदी भाषेत अनुवादित केलेला पहिला हॉलिवूड चित्रपट : ............ पार्क

६. विवियन रिचर्डस ....... इंडिजचे प्रसिध्द क्रिकेटपटू आहेत.

७. 'ब' जीवनसत्त्वाच्या अभावाने ...... बेरी हा रोग होतो.

८. एका धनगराकडे ४६ मेंढ्या होत्या. त्यातल्या २५ सोडून बाकीच्या सर्व मरण पावल्या. तर त्याच्याकडे किती मेंढ्या राहिल्या ?

१०. २५ वी जयंती म्हणजे ......... जयंती

१२. रामायणात ......... याने शूर्पणखाचे नाक कान कापले होते.

१३. मोबाईल फोनचा शोध : डॉ. ......... कूपर (माणिक/मार्टीन) यांनी लावला.

१४. बालवीर पथकाची स्थापना ........ पॉवेल यांनी केली.

१५. पांडवांची पत्नी, पांचालीचे नाव

१६. ......... जून, १६७४ रोजी जिजामाताने देह ठेवला.

## उभे शब्द

२. भारताच्या दक्षिणेकडून उत्तरेकडे वाहणारी एकमेव नदी कोणती ?

४. संत तुलसीदासांनी रचलेला एक महान ग्रंथ

५. ज्ञानदेवे रचिला पाया तुका झालासे .........

७. अमेरिकेचा राष्ट्रीय खेळ

९. पहिली भारतीय महिला पोलीस अधिकारी

११. ऑस्ट्रेलियाची राजधानी

उत्तरे इतरत्र

# दादाला विचारु या

**प्रश्न : नेहमी सत्संग करणारे काही सज्जन बऱ्याचदा सत्संगापासून दूर गेलेले पहायला मिळतात, असे का ?**

**उत्तर :** ज्यावेळी एखाद्याच्या कथनी आणि करणीमध्ये फरक पडतो तेव्हा तो आपोआपच सत्संगापासून दूर होतो. अन्यथा सत्संगापासून अलग कोणीही करु शकत नाही.

**प्रश्न : निराकार-प्रभु-परमात्म्याला कधीही दोष देऊ नये, उलट त्याचे आभारच मानावेत, असे का म्हटले आहे ?**

**उत्तर :** निराकार-प्रभु-परमात्म्याच्या इच्छेत आनंदाने राहणाऱ्या भक्तांवर प्रभु-परमात्मा अपार कृपा करत असतो. म्हणून भक्तजन कधीही ईश्वराला दोष न देता आभारच मानतात. ते नेहमी अशाच पद्धतीने विचार करतात, की माझ्या पायात चप्पल नसली म्हणून काय झालं ? पाय तर आहेत.

**प्रश्न : अनेकदा आम्ही व्यक्त केलेल्या इच्छा पूर्ण का होत नाहीत ?**

**उत्तर :** प्रभु-परमात्म्याला मात्र चांगले ठाऊक आहे, की कोणत्या गोष्टीत आमचं हित आहे; कोणती गोष्ट आम्हाला लाभदायी आहे त्यामुळे जी इच्छा पूर्ण झाली नाही, ती आमच्यासाठी नक्कीच हानिकारक असणार यात शंकाच नाही.

**प्रश्न : खूप धनसंपत्ती असूनही एखादी व्यक्ती दु:खी, असमाधानी असते. अशावेळी त्यांनी काय केले पाहिजे ?**

**उत्तर :** भौतिक सुखासाठी आणि दैनंदिन गरजा भागवण्यासाठी धनाची खूप आवश्यकता आहे. म्हणून धन-संपत्ती कमावणे, साठवणे गैर नाही; परंतु या धनातील काही भाग हा संत-महात्म्यांच्या सेवेसाठी, परोपकारासाठी, मानव कल्याणासारख्या दैवी कार्यासाठी खर्च केला जावा. तेव्हाच ती धनसंपत्ती सुख देणारी ठरते.

**प्रश्न : दैवी गुणांनी समृध्द होण्यासाठी आम्ही काय केले पाहिजे ?**

**उत्तर :** आपण सर्व काही जाणतो असे न समजता सदैव विनम्र होऊन शिकण्याची भावना ठेवावी. ज्याच्या अंगी नम्रता असते, तो सदैव काही ना काही शिकत असतो. सत्संग-सेवा-स्मरण नित्य नियमाने करतो. यातूनच अंगी दैवी गुण विकसित होत जातात.



# सद्गुरु वचनामृत

## सकारात्मक बदल

पृथ्वीला स्वर्ग बनवायचे असेल, तर ते फक्त आपल्या कर्माद्वारे आपण बनवू शकतो. आपण नेहमी म्हणतो, की जर एखादी सुंदर इमारत आहे, सुंदर दृष्य आहे, सुंदर बाग आहे किंवा नदी आहे, समुद्र आहे. ते बघून म्हणतो, की स्वर्गासारखे वाटते. परंतु त्याच ठिकाणी आपसात हाणामारी करत आहोत, भांडण-तंटे करत आहोत, शिवीगाळ करत आहोत तर मग तो स्वर्ग कसा होईल ? वास्तवात पृथ्वीवर स्वर्ग आणायचा असेल तर मिळून-मिसळून राहिले पाहिजे. पडणाऱ्यांना उठवावे लागेल. जर कोणी रडत असेल तर त्याचे अश्रू पुसून आनंद द्यावा.

आपण बाबाजींकडूनही ती ओळ श्रवण

केली, ‘मिल जुल कर हम रह सकते है दिल को यदि विशाल बनायें।’ एक इंग्रजी वाक्य आहे - We Should learn to live together as brothers or perish together as fools. (आम्हाला भावंडासारखे एकत्रित होऊन राहणे शिकले पाहिजे, मूर्खाप्रमाणे एकत्रित होऊन नष्ट होणे नाही.) जो सकारात्मक बदल आपल्याला बाहेर बघायचा आहे तो प्रथम अंत:करणात आणायला पाहिजे. जो बदल जगात बघायचा आहे, तो बदल स्वत:त आणायला पाहिजे.

पोलियो या रोगाबद्दल आपण सर्वांनी ऐकले आहे, तो रोग नष्ट करण्यासाठी किती प्रयत्न केले गेले. जागोजागी शिबिरं लावली गेली, घराघरात जाऊन समजावले गेले, की मूल जन्मल्यानंतर थोड्या-थोड्या दिवसांनी पोलियोचा डोस द्यायचा असतो. मग आता कठोर परिश्रमानंतर पोलियो पूर्णपणे नष्ट झाला आहे. याप्रकारेच वैर, ईर्ष्या यासारखे रोग नष्ट करायचे असतील तर प्रथम आपल्याला आपल्यात सकारात्मकता आणावी लागेल. मिशनच्या शिकवणींचे पालन करावे लागेल. प्रेमाच्या संदेशाचे पालन केले तरच लोकांपर्यंत हा संदेश पोहचवू शकतो. आपले जीवन गुरसिखासारखे बनवायला पाहिजे. जेणेकरुन कोणीही भेटो तो आश्चर्यचकीत आणि आकर्षित व्हायला पाहिजे, की यांच्याकडे असं काय आहे? हे मिळून मिसळून आणि प्रेमाने राहत आहेत. शांती आणि समाधानाने आपले जीवन व्यतीत करत आहेत.

निराकार कृपा करो, मिशनचं प्रत्येक मूल आपल्या जीवनात विनम्रता, प्रेम, बंधुभाव आणू शकेल. निरंकार सर्वांना असे सुंदर जीवन प्रदान करो.

❑❑❑

## एकमेकांचे शुभचिंतक बनूया

जगामध्ये जाणण्यायोग्य खूप काही आहे. परंतु आपण तेच जाणून घ्यावे जे जाणल्याने आपल्या तमाम भ्रम-भ्रांती मिटून जातील. इहलोक आणि परलोकाचे बंधन समाप्त होईल आणि आत्मा आपल्या निजघराची प्राप्ती करेल. आपण ते जाणावे, ज्यामुळे इहलोकाचा प्रवास वैर, द्वेष, ईर्ष्येने नव्हे तर प्रेमाने पार होईल. आपण एकमेकांचा स्वीकार करु या. त्यामुळे वसुधैव कुटुंबकम्ची भावना साकार होईल, साऱ्या धरतीवर राहणारे लोक एकाच परिवाराचा भाग आहेत असे मानल्याने आपल्या मनात आपुलकीचा भाव प्रबळ होतो. आपण एक दुसऱ्यात एकमेकांचं प्रतिबिंब बघतो. कोणाला वेगळं, कोणाला परकं समजत नाही. समदृष्टिचा भाव निर्माण होतो. जेव्हा संतांचा उल्लेख होतो तेव्हा असेच म्हटले जाते, की संत समदृष्टिवाले असतात. ते त्या दृष्टिने बघत असतात, जी सर्वांना समानतेने बघते. जेव्हा मनाचा असा भाव बनतो तेव्हा तिथे आपुलकीचा भाव प्रबळ होत जातो. मग सारे एकमेकांच्या जवळ येऊन एकमेकांचे शुभचिंतक बनतात.

**- बाबा हरदेवसिंहजी महाराज**



कथा

# ज्ञान आणि अहंकार

एकदा एका ऋषींना ही जाणीव झाली होती, की आपण खूप मोठे ज्ञानी झालोत. एकदा प्रवासात त्यांना तहान लागली. त्यांनी पाहिलं, की जवळच एक वृध्द स्त्री विहिरीवर पाणी भरत आहे. ऋषी म्हणाले, "माते, मला पाणी देशील तर तुला खूप पुण्य मिळेल." वृध्द स्त्री म्हणाली, "बाळा, मी तुला ओळखलं नाही. कृपया तू तुझा परिचय दे. मगच मी तुला पाणी देते." मग ऋषींनी आपला परिचय देण्यास सुरुवात केली.

ऋषी म्हणाले, "मी प्रवासी आहे."

वृध्द स्त्री म्हणाली, "प्रवासी तर फक्त दोनच आहेत. एक चंद्र आणि दुसरा सूर्य. जे दिवसरात्र चालतच असतात."

ऋषी म्हणाले, "मी अतिथी आहे."

वृध्द स्त्री म्हणाली, "अरे! अतिथी तर फक्त

दोनच आहेत. एक धन आणि दुसरं तारुण्य. ते निघून जातात. खरं सांग तू कोण आहेस?"

ऋषी म्हणाले, "मी सहनशील आहे. आता तरी पाणी मिळेल?"

वृध्द स्त्री म्हणाली, "अरे सहनशील तर फक्त दोनच आहेत! एक धरणी आणि दुसरं झाड. धरणी जी पुण्यवान लोकांबरोबरच पापी लोकांचं देखील ओझं वाहत आहे आणि एक झाडं, ज्यांना दगड मारले तरी ती मधुर फळंच देतात."

ऋषी आता हतबल झाले. ते म्हणाले, "मी हट्टी आहे."

वृध्द स्त्री म्हणाली, "नाही! तू हट्टी कसा असशील? हट्टी तर फक्त दोनच आहेत. एक नख आणि दुसरे केस. कितीही कापले तरी परत वाढतातच."

ऋषी आता कंटाळले आणि म्हणाले, "मी मूर्ख आहे."

वृध्द स्त्री म्हणाली, "मूर्ख तर फक्त दोनच आहेत. एक असा राजा ज्याची योग्यता नसताना तो सर्वांच्यावर राज्य करतो आणि दुसरा दरबारातील पंडित. जो अशा राजाला खूश करण्यासाठी चुकीच्या गोष्टीला खरं सिध्द करण्याचा प्रयत्न करतो."

ऋषी आता काहीही बोलण्याच्या मन:स्थितीत नव्हते. ते त्या स्त्रीच्या पायावर डोकं ठेऊन पाण्यासाठी विनवणी करु लागले.

वृध्द स्त्री म्हणाली, "उठ बाळा!" ऋषींनी वर पाहिलं तर त्या स्त्रीच्या जागी साक्षात देवी सरस्वती साकार रुपात उभी होती. ऋषी आता नतमस्तक झाले.


देवी सरस्वती ऋषींना म्हणाली, "शिक्षणाने ज्ञान येते, अहंकार नाही. शिक्षणाच्या बळावर मिळालेला मान, सन्मान आणि प्रतिष्ठा यालाच तू सर्वस्व समजलास आणि त्याचा तुला अहंकार झाला म्हणून तुझे डोळे उघडणे आवश्यक होते." ऋषींना त्यांची चूक समजली. ते पाणी पिऊन पुढील प्रवासाला निघाले.


विद्वत्तेवर कधीच गर्व करु नये. ८४ लाख जीवांमध्ये फक्त माणूस पैसे कमावतो; पण कुठलाच जीव उपाशी राहत नाही आणि माणूस पैसे कमवून सुध्दा त्याचं कधीच पोट भरत नाही.

❑❑❑

एखाद्याने कागदावर दिव्याचं चित्र काढलं. त्यात दिवा जळताना दाखवला असला तरी त्या चित्रामुळे प्रकाश पडणार नाही. तसे, सत्य परमात्मा जोपर्यंत जीवनात प्रत्यक्ष येत नाही तोपर्यंत जीवनातील अंधार दूर होणार नाही. ईश्वराच्या नावाचा जयजयकार करण्याने किंवा त्याच्या नावाचं रटन केल्याने अंधार दूर होणार नाही. यासाठी स्वत:ला प्रभु-परमात्म्याचा साक्षात्कार झाला पाहिजे.

**- निरंकारी बाबाजी**


आजोबा
चित्रांकन : दीपक मेहरा (दिल्ली)
चित्रांकन -रंग : अजय कालडा
एके दिवशी एक बकरी गावातून पळून जंगलात गेली.
अरे वा! इथं तर फारच छान हिरवं हिरवं गवत उगवलं आहे. मी जर इथे थांबले, तर मला पोटभर गवत खायला मिळेल.
तिला आठवलं, की गावी असताना तिचा मालक तिला केवळ सुका चाराच खायला देत असे.
पूर्ण दिवस बका-बका खात असते आणि दूध द्यायच्या वेळी फक्त एकच तांब्या भरुन दूध देते.
दूध काढण्यासाठी नेहमी तयार असतो; पण खायला सुका चारा देतो. कंजूष कुठला.
आता जंगलात बकरी केवळ स्वतंत्रच नव्हती तर आपल्या मनाची मालकीण होती. तिथे खाण्याची देखील काही कमतरता नव्हती.
हे आहे मजेशीर आयुष्य! जेव्हा पाहिजे तेव्हा, जिथे पाहिजे तिथे फिरा. पाहिजे तितके खा. गावात तर नेहमी ओंडक्याला बांधून राहावं लागत होतं.


आता बकरीला भरपूर गवत खायला मिळत असे. पोटभर खाण्यामुळे बकरी अंगाने सुदृढ व जाडजूड झाली होती.


एके दिवशी एक शिकारी त्या जंगलात शिकारीसाठी आला.
अरे ! किती मस्त बकरी आहे ह्या जंगलात.


शिकारी बकरीच्या मागे धावू लागला तशी बकरी जीव वाचवण्यासाठी पळू लागली.
बें ! बें !
किती लांब पळशील माझ्यापासून ?


बकरी खाऊन-खाऊन जाड झाल्यामुळे तिला जोरात पळता येत नव्हते.
हे देवा ! हा शिकारी तर माझा पाठलाग करत-करत माझ्या बऱ्याच जवळ येऊन पोचला.
त्याचवेळी बकरीला झाडी असलेले मोठ्या पानाचे एक झाड नजरेस आले. तिने विचार केला, की जर मी या झाडाच्या मागे लपले तर शिकारी मला पाहू शकणार नाही. मला आता पळवत देखील नाही.
शिकारी बकरीला पाहू शकला नाही. तो तिला शोधत पुढे निघून गेला.
झाडाची हिरवीगार पानं पाहून बकरीच्या मनात ती पानं खाण्याची लालसा जागृत झाली. तिने विचार केला, की आज मी हीच पानं खाते.


बकरीने पानं खायला सुरुवात केली.
आज तर फार मजा आली.
परंतु झाडाची पानं खाऊन कमी झाल्यामुळे थोड्यावेळातच बकरी नजरेस येऊ लागली. त्याचवेळी शिकारी बकरीला शोधत तिथं आला व त्याने बकरीला पाहिले.
अस्सं! तू इथं लपली आहेस काय!. आता तर मी तुला नक्कीच पकडणार.
बकरीने झाडाची पानं खाल्ल्यामुळे ती शिकाऱ्याच्या नजरेस पडली व त्याने तिला पकडून नेले.
अरे देवा! मी हे काय केलं? ज्याने मला आश्रय दिला मी त्याचंच नुकसान केलं आणि आपल्या लालची वृत्तीमुळे पकडली गेली.
तात्पर्य : कधीही आपल्या आश्रयदात्याचे नुकसान करु नये.

# विमलताई कर्वे

शिक्षणसंस्था म्हणजे देशाचा कणा. हा कणा ताठ तर देशाची मान ताठ...... हे समीकरण मनाशी पक्के करुन विमलताई कर्वे यांनी ६ जून १९५२ रोजी ठाण्यातील ब्राह्मण सोसायटीत एका शाखेचे बीज रोवले. आज सरस्वती सेकंडरी स्कूलच्या रुपाने त्याचा वटवृक्ष झाला आहे. विमलताई मूळ पुण्याच्या. घरात स्वातंत्र्यसैनिकांचा वारसा. त्यामुळे देशभक्ती रक्तात. १९४८ साली खालसा कॉलेजचे प्राचार्य चिंतामणी कर्वे यांच्याशी विवाह झाल्यानंतर त्या ठाण्यात आल्या. मुलीला उत्तम शिक्षण मिळायला हवे, या तळमळीतून स्वतःच शाळा सुरु करण्याचा निर्धार त्यांनी केला. ब्राह्मण सोसायटीतल्या सुहृदांची साथ लाभली. आधी सहस्त्रबुध्दे वाडा, उमा नीळकंठ व्यायामशाळा आणि ब्राह्मण सेवासंघात ३०-४० विद्यार्थ्यांसह भरणाऱ्या शाळेत आज तीन हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी शिकत आहेत. या वाटचालीत अनंत अडचणी आल्या. त्यावर मात करत १९६४ साली त्यांनी सरस्वती मंदिर ट्रस्टची स्थापना केली. सुप्रीम कोर्टापर्यंत लढा देत बाईंनी शाळेसाठी मैदान मिळवले. बाईंनी मदतीची हाक दिल्यानंतर ठाणेकरांनी मैदानासाठी अवघ्या १५ दिवसांत १३ लाख रुपये (१९८५ सालचे) उभे केले. पुढे विमलताईंनी व्याजासह हे पैसे परत केले. या मैदानावर इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करण्यासाठी आलेली आमिषे बाईंनी झुगारुन लावली. मुलांना खेळण्यासाठी मैदान हवेच, असा त्यांचा आग्रह असायचा. केवळ मैदानच नाही तर स्वतःची क्रिडा प्रबोधिनी आणि त्यासाठी स्वतंत्र इमारत असलेली ही मुंबई-ठाण्यातली एकमेव शाळा आहे.

विमलताई करारी स्वभावाच्या होत्या. त्याकाळी सीसीटीव्ही नसले तरी प्रत्येक वर्गात काय सुरु आहे, याची खबर बाईंना असायची. शाळेत दरारा असला तरी त्यांची कधी कुणाला भीती वाटली नाही. कुणाचा फुकटचा पैसा घेणार नाही आणि कुणाला देणार नाही हे त्यांचे तत्व घट्ट होते. सभोवतालच्या शाळा डोनेशनच्या नावाखाली लाखो रुपये उकळत असताना शाळाप्रवेशासाठी पैसे घेण्यास बाईंचा सक्त विरोध होता. ट्रस्टींच्या मिटींगमध्ये होणाऱ्या चहापानाचा खर्चही कधी शाखेच्या खाती पाडला नाही. काटकसर करुन वाचविलेल्या पैशातून आपण सर्वोत्तम शिक्षण देऊ शकतो, हे त्यांनी सप्रमाण सिध्द केले. विमलताई आज हयात नसल्या तरी त्यांची शिकवण सरस्वती सेकंडरी शाळेच्या उज्ज्वल भवितव्यासाठी कायम प्रेरणा देणारी ठरेल.

❑❑❑

# प्राण्यांची शाळा

कवीता : बाळकृष्ण कासार








सुट्टी संपली सुट्टी संपली, चला पळा पळा,
सुंदरवनात प्राण्यांची आज, भरली आहे शाळा
नवीन दप्तर घेऊन हत्ती, आला पळत पळत,
पहिला बेंच म्हणे मला, कधीच नाही मिळत
शुभ्र पांढरे कपडे घालून, आलाय बघा ससा,
शाळा नको म्हणून गाढव, रडतोय बघा कसा
चिमणी करते चिव-चिव, कावळा करितो काव-काव,
उड्या मारुन माकड म्हणे, चला खेळूया डाव
वाघ आणि सिंह म्हणे, मॉनिटर मी होणार,
हरीण, कोल्हा, जिराफ म्हणे, आम्ही नाही भिणार
कासव म्हणे चला पुढे, सावकाश मी येणार,
कोकीळा म्हणे बाई मी, छान कविता गाणार
पोपट सर थाटात आले, हाती घेऊन छडी,
सारा वर्ग शांत झाला, हाताची घालून घडी
पहिला दिवस शाळेचा, खूप खूप आली मजा,
भरपूर झाली दंगामस्ती, कुणास नाही सजा











# किल्ले कोरीगड- कोराईगड

कोरीगड-कोराईगड किल्ला हा ३००० फूट उंचीचा हा किल्ला गिरीदुर्ग प्रकारातील आहे. लोणावळ्याच्या दक्षिणेला सहज जाता येण्यासारखा हा किल्ला. घाटमाथ्यावर असल्यामुळे एकाच वेळी कोकण व देशावरील परिसराचे विस्तृत दर्शन घडते. ३००० फूट उंचीच्या किल्ल्यावर कोराईदेवीचे मंदीर व मोठे तळे पाहण्यासारखे आहे. बुरुजावरुन कोकणातील मुलुखाचे विहंगम दृश्य दिसते. मुळशी धरणाच्या पश्चिमेकडे एक मावळ आहे त्याचे नाव आहे कोरबारस मावळ. याच मावळ प्रांतात कोरीगड आणि धनगड हे किल्ले येतात. लोणावळा आणि पाली यांच्याकडे असणाऱ्या सव्वाशिणी घाटाच्या माथ्यावर कोरीगड आहे. हा किल्ला प्रसिध्द आहे. त्याच्या सद्द:स्थितीला असलेल्या अखंड तटबंदीमुळे या भागातील किल्ले पहावयाचे असल्यास तीन ते चार दिवसांची सवड हवी. कोरीगड, घनगड, सुधागड आणि सरसगड यासारखा सुंदर ट्रेकही या भागात आपल्याला करता येतो.

## इतिहास :

या गडाचा इतिहासात फारसा कुठे उल्लेख नाही. १६५७ मध्ये महाराजांनी लोहगड, विसापूर, तुंग-तिकोना या किल्ल्यांबरोबर कोरीगड आपल्या स्वराज्यात दाखल करुन घेतला. मार्च १८१८ मध्ये एक तोफेचा गोळा दारुकोठारावर पाडून इंग्रजांनी हा गड जिंकला. गडावर मोठ्या प्रमाणावर प्राणहानी आणि वित्तहानी झाली.

## गडावरील पाहण्यासारखी ठिकाणे :

पेठ-शहापूर गावातून कोराईगड एका भिंतीसारखा भासतो. गडमाथा म्हणजे एक भलेमोठे पठारच आहे. गडाची तटबंदी साधारणतः दीड किलोमीटर लांबीची आहे. तटबंदीवरुन संपूर्ण गडाला फेरा घालता येतो. पेठ-शहापूरच्या वाटेने वर येताना मार्गात अनेक गुहा व पाण्याची टाके आणि श्री गणेशाची मूर्ती लाभते. गणेशदरवाज्याने अर्थात पेठ शहापूरच्या वाटेने वर आल्यावर समोरच वाड्यांचे अवशेष आढळतात. समोरच पठारावर दूरवर कोराईदेवीचे मंदिर आहे. मंदिराचा जिर्णोध्दार केला आहे. मंदिरासमोरच एक दीपमाळ आहे. कोराईदेवीच्या मूर्तीची उंची साधारणतः चार फूट आहे. गडावर दक्षिणेकडच्या बाजूस अनेक बुरुज आहेत. गडावर आजही सहा तोफा आहेत. त्यापैकी सर्वात मोठी लक्ष्मी तोफ कोराईदेवीच्या मंदिराजवळ आहे. याचप्रमाणे गडावर आणखी दोन मंदिरे आहेत. गडावर दोन विस्तीर्ण तळी आहेत. तळ्यांच्या पुढे आणखी दोन गुहा आहेत. येथेच शंख-चक्र-गदा-पद्मधारी श्री विष्णूची मूर्ती आहे. गडावरुन समोरच नागफणीचे टोक, तुंग, तिकोना, माथेरान, प्रबळगड, कर्नाळा आणि माणिकगड असा सर्व परिसर दिसतो.

## गडावर जाण्याच्या वाटा :

**पेठ-शहापूर :** कोरीगडला जाण्यासाठी लोणावळ्याला यावे. येथून आय.एन.एस. शिवाजीमार्गे आंबवणे किंवा भांबुर्डेला जाणारी बस पकडावी किंवा सहारा प्रकल्पाकडे जाणारी बस पकडावी आणि भुशी धरणाच्या पुढे, आय.एन.एस. शिवाजीच्या पुढे २२ कि.मी. वरील पेठ-शहापूर गावात उतरावे. या गावातून सरळ जाणारी पायवाट आपल्याला पायऱ्यांशी घेऊन जाते. पायऱ्यांच्या सहाय्याने वीस मिनिटांत गडावर पोहचता येते.

**आंबवणे गाव :** कोरीगडला जाण्यासाठी आंबवणे गावातूनही जाता येते. ही वाट मात्र जरा अवघड आहे. या वाटेने जाण्यासाठी लोणावळ्याहून भांबुर्डेमार्गे अथवा थेट आंबवणेकडे जाणारी बस पकडावी. गावातून अर्ध्या तासात गडावर जाता येते.

गडावरील मंदिरात राहण्याची सोय होते. किल्ल्यावर जेवणाची सोय नसल्याने ती आपण स्वतःच करावी. गडावर पाण्याची सोय नाही. गडावर दोन तळी असली तरी त्यातील पाणी पिण्यायोग्य नाही. पेठ-शहापूर मार्गे गडावर येणाऱ्या वाटेवर दरवाजाच्या अलीकडे एक टाके आहे. पिण्याच्या पाण्यासाठी हे वापरावे. गडावर जाण्यासाठी पेठ-शहापूरमार्गे अर्धा तास लागतो.

❑❑❑



आरोग्याचा मंत्र

# ओवा

❒ पोटात गॅस तयार झाल्यामुळे होणाऱ्या वेदनांपासून सुटका करुन घेण्यासाठी ओव्याला हलक्या आचेवर तव्यावर भाजून घ्यावे. नंतर हा भाजलेला ओवा एखाद्या कापडात किंवा विड्याच्या पानावर टाकून पोटावर ठेवावा किंवा पोटाला बांधावा. यामुळे पोटदुखीचा त्रास कमी होतो.

❒ ओव्याच्या सेवनाने भूक वाढते, त्यामुळे जेवणामध्ये याचा वापर नियमित करावा. ज्या लोकांना भूक लागत नाही, त्यांच्यासाठी ही पध्दत अत्यंत फायदेशीर सिध्द होऊ शकते.

❒ हिवाळ्यात दमा असलेल्या रुग्णांना अधिक त्रास होतो. अशावेळी ओवा गरम करुन एका छोट्याशा कापडात बांधावा आणि छातीवर ठेवावा. यामुळे रुग्णाला उष्णता मिळेल आणि थंडीपासूनही बचाव होईल.

❒ पोटाशी संबंधित समस्या असल्यास रुग्णाला चहामध्ये ओवा टाकून पिण्यास द्यावा. यामुळे रुग्णाचा त्रास कमी होण्यास मदत होईल. ओव्याचे सेवन केल्याने छातीतील जळजळ डायरीया, मळमळणे, उलटी येणे आणि ॲसिडीटीपासून सुटका होते.

❒ छातीत कफ तयार झाल्यास भाजलेला ओवा मधातून घेतल्याने आराम मिळतो.

❒ दातदुखीमध्येही ओवा सहाय्यक आहे. अशा स्थितीत लवंग तेलात ओव्याचे तेल मिसळून वेदना होत असलेल्या दातावर एक-दोन थेंब टाकावे.

❒ डोकेदुखी असल्यास किंवा मायग्रेनचा झटका आल्यावर ओव्यापासून तयार केलेल्या पावडरचा वास घेतल्याने रुग्णाला आराम मिळतो.

❒ आर्थरायटीसमध्ये गुडघा किंवा शरीराच्या इतर सांध्यात होणाऱ्या वेदनेतून सुटका करुन घेण्यासाठी ओव्याचे तेल त्या भागावर लावल्यास आराम मिळतो.

❒ ज्या लोकांना नेहमीच कफ होतो त्यांच्यासाठीही ओवा फायदेशीर आहे. १०० मि.ली. पाण्यात थोडा ओवा टाकून काही मिनिटे धीम्या आचेवर उकळून घ्यावा. थंड झाल्यावर या मिश्रणाचे सेवन करावे. यामध्ये तुम्ही साखरही मिसळू शकता.

❒ पोटात दुखत असल्यास तेलात ओव्याचे थोडेसे दाणे टाकून गरम करावे. कोमट झाल्यावर या तेलाने पोटाचा हलका मसाज करावा. यामुळे वेदना कमी होतात.

❒ मासिक पाळीतील होणाऱ्या वेदनेपासूनही ओव्याचे सेवन केल्याने आराम मिळतो. ओव्याचे चार-पाच दाणे चावून खाल्ल्याने पोटदुखीपासून आराम मिळतो.

❒❒❒

# आसन : पश्चिमोत्तासन

या आसनाला उग्रासन असे सुध्दा म्हणतात. उग्र शब्दाचा अर्थ शिव असा होतो. भगवान शिवप्रभुला संहारकर्ता मानण्यात येते. म्हणून तो उग्र किंवा भयंकर या अर्थगर्भित नावाने ओळखला जातो. हे आसन करण्यास अवघड असल्याने या आसनाला उग्रासन असे म्हणतात.


**कृती :** जमिनीवर बसून पाय लांब करुन ते ताठ ठेवा. त्यानंतर कमरेत पुढे वाकून दोन्ही हातांच्या अंगठ्यांनी तसेच पहिल्या व मधल्या बोटांनी पायाचे अंगठे पकडा. आता श्वास बाहेर सोडा आणि मग हळूहळू डोके दोन्ही गुडघ्यांना टेकेल असे खाली वाकवा. खाली वाकताना पोट आत खेचून घ्या. त्यामुळे तुम्ही सहजतेने खाली वाकू शकाल. खाली वाकताना डोके दोन्ही हातांच्यामध्ये वाकवा. ज्यांचा पाठीचा कणा लवचिक असतो अशा लोकांचे डोके पहिल्या प्रयत्नातच गुडघ्याला टेकते. स्थूल लोकांना हे आसन करताना त्रास पडतो. ज्यांच्या पाठीच्या कण्यात काही व्याधी आहे, अशा लोकांना हे आसन साधण्यास पंधरा दिवस ते महिन्याभराचा अवधी लागेल. हे आसन सुरुवातीला काही दिवस ५ सेकंदच करावे. पण ते जमू लागल्यानंतर ३० सेकंदांपासून दहा मिनिटांपर्यंत करावे.



**फायदे :**

- हे एक अत्यंत उपयुक्त आसन आहे. हे आसन श्वासाला ब्रह्मनाडी सुषुम्नामधून पसार करवते आणि जठराग्नी प्रदीप्त करते.
- हे आसन पोटातील चरबी कमी करते.
- हे आसन मूत्राशय, जठर, पित्ताशय वगैरे पोटाच्या अवयवांना कार्यक्षम बनवते.
- या आसनामुळे आतड्यांच्या आकुंचन व संकुचनाच्या क्रियेस वेग मिळतो. त्यामुळे पचनशक्ती सुधारते.

# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा


अनुज पाटील


मृणाली शिगवण


गार्गी जाधव


सेजल सिद


द्रिक्षा चव्हाण


सिया बारी


ओवी चौधरी


श्रियान भोईर


शौर्य पगार


अवनी जंगम


समरजित जाधव


अवनी बामणे


अनुश्री नांगरे


वेद पालवे


सावनी पाटील


मनस्वी महाजन


स्वराज जाधव


दिवांशु यादव

# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा







इंद्रधनू समान वसंतऋतू
फुलो तुमच्या अंगणी
याच शुभेच्छा आमच्या ओठी
तुमच्या वाढदिनी






# वैज्ञानिक प्रश्नोत्तरे

**प्रश्न : वनस्पती प्राण्यांना खाऊ शकतात काय ?**

**उत्तर :** काही वनस्पती अशा आहेत की, ज्या प्राण्यांना खातात. अशा वनस्पतींना कार्निव्होरस (मांसभक्षक) म्हणतात. अशा वनस्पती छोट्या प्राण्यांना खाऊन पचवतात आणि त्यांच्यापासून त्यांना मिळणारा नायट्रोजन हा वनस्पतींच्या पोषणाला उपयुक्त ठरतो.

या मांसभक्षक वनस्पती एखाद्या प्राण्याला पकडतात आणि त्याच्यावर विशिष्ट रसाचा प्रयोग करतात. या रसामुळे प्राणी विरघळतो. मग तो रस वनस्पती आपल्या स्नायूंमध्ये घेतात आणि त्याबरोबर नायट्रोजन शोषून घेतला जातो, जो प्राण्यामुळे मिळालेला असतो.

मांसभक्षक वनस्पती अनेक प्रकारच्या आहेत. काहींचे मार्ग धूर्तपणाचे लालूच दाखवून फसविण्याचे आणि पकडण्याचे आहेत. व्हीनस फ्लाय नावाच्या वनस्पतीची पाने मध्यभागी बिजागरी बसविलेल्या दोन भागांची असतात आणि पानांच्या कडांना लांब केसांची योजना असते. एखादा किटक पानांच्या लाल रंगाने आकर्षित होऊन जवळ आला की, पाने झटकन मिटून किटकाला सापळ्यात पकडतात. उष्ण प्रदेशात पिचर वनस्पती नावाच्या मांसभक्षक वनस्पती असतात. या वनस्पतींची पाने एवाद्या खोलगट भांड्यासारखी किंवा सुरईसारखी असतात. या वनस्पतींच्या जवळ येणारा किटक किंवा लहान आकाराचा प्राणी या भांड्यात पडतो आणि अडकून राहतो. पुढे तो वनस्पतींकडून फस्त केला जातो.

सर्वात विलक्षण अशी मांसभक्षक वनस्पती ही ब्लॅडखोटे नावाने ओळखली जाते. ही वनस्पती पाण्याच्या प्रवाहावर तरंगत असते. पाण्याच्या खाली बुडबुड्यांसारख्या भासणाऱ्या पिशव्या असतात. ह्या पिशव्या म्हणजे छोटे जलचर प्राणी पकडण्याचे सापळेच असतात. पाणमाशा, छोटे मासे अशांसारखे प्राणी येथून जाताना त्यांचा पिशवीला स्पर्श झाला की, पिशव्या उघडल्या जातात आणि आपले भक्ष्य आत खेचून घेतात.

प्राणी वनस्पती खातात, पण काही वनस्पती प्राण्यांना खातात. हे खरे असूनही सहज विश्वास बसण्यासारखे नाही.

**प्रश्न : मोबाईलचा शोध कोणी लावला ?**

**उत्तर :** आज मोबाईल फोन अत्यंत गरजेची वस्तू बनली आहे. शहरातच नव्हे तर खेडोपाडी लहान मुलेही मोबाईलचा वापर करताना दिसतात. केवळ संपर्कासाठी, बोलण्यासाठीच नव्हे तर मोबाईल आता बहुउद्देशीय बनला आहे. त्याचा आकार छोटा आणि किंमतही सर्वांना परवडण्यासारखी झाली आहे.

४५ वर्षांपूर्वी मोटोरोला कंपनीचे उपाध्यक्ष मार्टिन कूपर यांनी मोबाईल फोनचा शोध लावला; तो ३ एप्रिल १९७३ साली. हा पहिला फोन वजनदार व आकाराने भरभक्कम होता. या मोबाईल फोनचे वजन होते अडीच पौंड (१.१३ कि.ग्रॅम) आणि किंमत होती ४००० डॉलर्स. या फोनचे नाव होते 'ब्रिक'

# ‘बूटा’ मिशनचा



मित्रांनो, आपणाला कोणी विचारले, की संत निरंकारी मिशनची स्थापना कधी झाली ? तर आपण उत्तर देतो, की १९२९ साली. परंतु तुम्हाला हे माहिती आहे का निरंकारी मिशनची स्थापना झाली तेव्हा कोणता दिवस व कोणता महिना होता ? तेव्हा तो दिवस व महिना होता, २५ मे १९२९. परंतु त्याच दिवशी निरंकारी मिशनच्या स्थापनेचा दिवस का निश्चित केला असेल बरं ? कारण त्या दिवशी बाबा बूटासिंहजींनी बाबा अवतारसिंहजींना ब्रह्मज्ञान देऊन क्षणार्धात त्यांच्यासमोर परब्रह्म परमात्म्याचे ज्ञान प्रकट केले. म्हणून २५ मे १९२९ या महान दिवसाला संत निरंकारी मिशनचा स्थापना दिवस मानले गेले आहे.

बाबा बूटासिंहजी महाराज हे संत निरंकारी मिशनचे संस्थापक होते. १९१४ साली त्यांना बाबा काहनसिंहजीकडून सर्वशक्तिमान निरंकार प्रभूचे दर्शन घडले. त्यांना झालेल्या आनंदाचे वर्णन शब्दात लिहिता येणार नाही. १९१४ ते १९२९ पर्यंत जवळ-जवळ १५ वर्षे बाबा बूटासिंहजींनी भक्तीचा आनंद घेतला. त्यानंतर वयाच्या ५५ व्या वर्षी ब्रह्मज्ञान देण्याची अनुमती मिळाल्यावर त्यांनी जगातून अज्ञानरुपी अंधकार नाहिसा करण्याची प्रतिज्ञा केली.

बाबा बूटासिंहजी महाराज गोंदण (टॅटू) काढण्याचे काम करत असत. स्वकष्टार्जित कमाईतून स्वत:चा व परिवाराचा चरितार्थ चालवत होते आणि त्यातून संतांची सेवा देखील करीत होते. बाबा बुटासिंहजींचे व्यक्तिमत्त्व अत्यंत तेजस्वी होते. १८७३ ते १९४३ असे ७० वर्षांचे आयुष्य त्यांना मिळाले. एवढे वय होऊनही त्यांचे केस शेवटपर्यंत काळेभोर राहिले होते. भगवंताच्या भक्तिमध्ये रंगून जाऊन विरोधकांना किंवा निंदकांना न घाबरता निडरपणे आणि निर्वैरभावनेने एखाद्या महाराजाप्रमाणे जीवन ते जगले. १९२९ ते १९४३ या सुमारे १४ वर्षांच्या काळात बाबा बूटासिंहजींनी अखिल विश्वाला सावली देणारे संत निरंकारी मिशनरुपी ‘बूटा’ (अर्थात रोपटे) लावून त्याला इतके मजबूत बनविले, की त्याचे विशाल रुप आता आपण पाहत आहोत.

मित्रांनो, बाबा बूटासिंहजी महाराज यांच्या सान्निध्यात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तिला ते ब्रह्मज्ञान देत असत आणि निराकार प्रभूशी जोडत असत. परंतु आजच्या युगात जर ईश्वराशी जोडायचे असेल तर आपण ज्ञानींसारखे आचरण केले पाहिजे. तरच आपल्या सान्निध्यात येणारी प्रत्येक व्यक्ती ईश्वराशी जुडण्यास प्रवृत्त होईल.

- संदर्भ : दिव्यगाथा

❒ संग्राहक : अंकित चं. जाधव

दिव्य वाणी

# जीवनात सत्संगाचं महत्त्व



संतजन भक्तीच्या रंगात रंगून समर्पित भावनेने निराकार परमात्म्याची सेवा करतात. भक्तीविषयी त्यांना अशी ओढ लागते की ते नेहमीच सत्संगाला जातात. सत्संगामुळे ईश्वराविषयी त्यांची श्रध्दा दृढ होते. संसाराच्या प्रभावामुळे ईश्वरभक्तीपासून दुरावलेली मानसिकता सत्संगामुळे पुन:जागृत होते. म्हणून ते सत्संगाला महत्त्व देतात; जेणेकरुन त्यांची मनोवृत्ती प्रत्येकक्षणी प्रभू परमात्म्याशी जोडून राहावी. आणि दुसऱ्यांचे कल्याण करण्याची भावना बनावी. संतजन सेवेचे महत्त्व जाणून तन-मन-धनाने निष्काम सेवा करत असतात. म्हणून त्यांची तुलना वृक्षांशी केली जाते कारण वृक्ष परोपकारासाठी आपले सर्वस्व अर्पण करतो. नामस्मणाची महती जे जाणत असतात. ते अष्टौप्रहर नामस्मणात राहून निरंकार प्रभू आपल्या अंगसंग असल्याचा अनुभव करतात; याला कधीही मनरुपी डोळ्यापुढून ढळू देत नाहीत; याला कधी विसरत नाहीत. क्षणोक्षणी याच्याशी आपले नाते जोडून ठेवतात.

ते माणसाला जागृत करतात, की हे माणसा तू केवळ स्वत:ला शरीर मानून आयुष्य घालवू नकोस, तुझ्यामध्ये असलेल्या अविनाशी प्रभुचा अंश आत्मा याचे कल्याण करण्यासाठी प्रयत्न कर आणि परमात्म्याचा आधार घेऊन जीवन व्यतीत कर. तू आपल्या मनामध्ये आत्मपरीक्षण कर, की तू आपल्या जीवनात कोणत्या गोष्टींना महत्त्व देत आहेस. तुझे विचार कोणत्या प्रकारचे आहेत, कोणत्या कारणासाठी तुला हा अनमोल मनुष्य जन्म मिळाला आहे. गुरु-पीर-पैगंबरांनी युगानुयुगे माणसाला समजावलं आहे, की आत्म्याचे नाते परमात्म्याशी जोडून भक्ती करणे हे जीवनाचे वास्तविक उद्दिष्ट आहे. पारब्रह्म परमात्म्यावरच सर्व प्राणिमात्रांचे अस्तित्व टिकून आहे, हाच सर्व संसाराचा आधार आहे, तू या मूळ स्वरुपाची ओळख करुन घे. या मूळ तत्त्वाचा बोध करुन घेऊन याच्याशी नाते जोडल्याने तुझे या जगामध्ये येणे आणि राहणे कल्याणकारक होईल.

जो माणूस आपल्या या मूळ उद्देशाला प्राप्त करुन आपली जीवनयात्रा संपन्न करतो तोच अभिनंदनाला पात्र ठरतो. कारण तो चौऱ्याऐंशी लाख योनींच्या चक्रातून मुक्त होतोच पण आपला इहलोक सुखी आणि परलोकसुध्दा सफल करतो. संतजण माणसाला हेच सांगत असतात, की हे माणसा, जितक्या लवकर तू हे ब्रह्मज्ञान प्राप्त करशील तितक्याच शीघ्र गतीने तुझ्या मनावरचे ओझे हलके होईल आणि तुझी पुढील जीवनयात्रा आनंदाने व्यतीत होईल.

❐❐❐

कथा : नितीन ल. घुरुप (माणगाव-रायगड)

# वेड्याचे शहाणपण

सदाशिव नावाचा एक श्रीमंत आणि सुशिक्षित माणूस होता. एकदा आपल्या कारमध्ये बसून स्वत: ड्रायव्हिंग करीत प्रवासाला निघाला. काही अंतर पुढे गेल्यानंतर अगदी उतारावर दुर्दैवाने कारचा एक टायर पंक्चर झाला. कशीबशी कार थांबवून त्याने डिक्कीतील स्टेपनी बाहेर काढली व जॅक लावून पंक्चर झालेले चाक स्पॅनरचा वापर करुन काढले. पंक्चर चाक काढताना त्याचे निघालेले नट त्याने जवळच ठेवले; परंतु तेथे जास्तच उतार असल्याने ते सर्वच्या सर्व नटबोल्ट घरंगळत जाऊन जवळच्या खोल डबक्यात पडले.

त्याची कार जेथे पंक्चर झाली होती तेथे नेमके एक वेड्यांचे हॉस्पिटल होते. एक वेडा हॉस्पिटलच्या तार कंपाऊंडच्या आत उभा राहून बराच वेळ सदाशिवचा पंक्चर झालेले चाक बदलण्याचा खटाटोप बघत होता.

सदाशिवाने निराशेने बसकण मारली. नटबोल्ट आणायचे कोठून हा प्रश्न त्याला पडला होता. हे बघून तो वेडा पुढे झाला व सदाशिवाला म्हणाला, साहेब नटबोल्ट हरवले म्हणून काय झालं ? तुम्ही असं करा, बाकीच्या सर्व चाकांचा एक एक नट बोल्ट काढा व त्या चाकाला वापरा. तुमचा प्रश्न सुटेल. सदाशिवला वेड्याचे म्हणणे पटले व त्याने तसेच करुन ते चाक त्या ठिकाणी फीट केले.

त्या वेड्याचा शहाणपणा पाहून सदाशिवला आश्चर्य वाटले. तो त्या वेड्याला म्हणाला, मला आश्चर्य वाटते, की तुला हे असे आतमध्ये कोंडून का ठेवले आहे ? यावर वेडा हसतच म्हणाला, याचं कारण हे आहे, मी वेडा आहे; परंतु मूर्ख नाही.

मित्रांनो, सगळ्या चांगल्या गोष्टींना जग वेडेच म्हणते. जगाच्या दृष्टीने सारे जण मूर्ख, वेडे असतात. पण हेच वेडे जेव्हा अलौकिक कर्तृत्व प्रगट करतात तेव्हा तेच लोक त्याला डोक्यावर घेऊन नाचतात. म्हणून कुणाला कमी लेखू नये.

❑❑❑

# हसा मुलांनो हसा

मम्मी : बाळांनो, मी सांगितलेलं काम जो निमूटपणे करेल; उलट उत्तर देणार नाही त्याला मी रोज एक बक्षीस देत जाईन.

मुलं : मग तर सारी बक्षीसं पप्पाच घेऊन जातील.

बन्याने मेडिकल स्टोअरमधून एक औषधाची बाटली विकत घेतली. बिल घेतल्यावर बन्या म्हणाला, “साखर पण द्या.”

स्टोअरकिपर : इथं साखर मिळत नाही.

बन्या : काय हो, मला काय वेडा समजलात का ? या औषधाच्या बाटलीवर स्पष्ट लिहिलय – शुगर फ्री.

बंड्या (औषध विक्रेत्याला) : काका, परवा तुम्ही दिलेली किडे मारण्याची पावडर परत द्यायला आलोय.

औषध विक्रेता : का रे बाबा, काय झालं ?

बंड्या : ह्या पावडरमध्ये किडे पडलेत.

शिक्षक : मुलांनो, श्रध्दा भावनेने भगवंताला प्रार्थना केली तर ती अवश्य सफल होते.

एक विद्यार्थी : जाऊ द्या हो सर, जर हे खरं असतं तर तुमची बदली दुसऱ्या शाळेत कधीच झाली असती.

साताऱ्याहून मुंबईला लेकीकडे आलेल्या मैनाबाई दुपारी भाजीपाला खरेदी करण्यासाठी निघाल्या. येताना एका कपड्याच्या दुकानात शिरल्या. दुकानदाराने त्यांना अनेक प्रकारचे कपडे दाखवले. शेवटी तो थकला आणि कंटाळून म्हणाला, “ताई माफ करा. तुम्हाला पसंत पडेल असे कपडे मी दाखवू शकलो नाही.”

मैनाबाई म्हणाल्या, “काही हरकत नाही. खरं तर मी भाजी घ्यायला आले होते. आपल्या दुकानात ए.सी. चालू आहे म्हणून वळले होते.”

बायको : (नवऱ्याला) माझ्या वाढदिवशी तुमच्याकडून मला ब्लॅकबेरी किंवा ॲपल पाहिजे.
नवरा : वेडी कुठली कलिंगड खा. सीजन चालू आहे.

एस.टी. ड्रायव्हरच्या भरतीसाठी मुलाखतीला गेलेल्या पक्याला तेथील अधिकाऱ्याने प्रश्न विचारला, "ड्रायव्हर आणि कंडक्टरमध्ये काय फरक आहे ?"
पक्या : कंडक्टर झोपला तर कोणाचंच तिकीट निघणार नाही पण ड्रायव्हर झोपला तर मात्र सर्वांचच तिकीट निघेल.

एका डॉक्टरने नवीनच क्लिनिक उघडलं होतं. तेवढ्यात एक मनुष्य तेथे आला. आपण खूप कामात व्यस्त आहोत असं दाखवण्यासाठी डॉक्टरने टेबलावरचा फोनचा रिसिव्हर उचलला व म्हणाला, "सध्या अपॉईंटमेंट मिळणे कठीण आहे. तुम्ही पुढच्या महिन्यात फोन करा." असे म्हणत समोरच्या व्यक्तीला विचारले, "बोला काय झालंय तुम्हाला ?" ती व्यक्ती म्हणाली, "मी टेलिफोन ऑफिसमधून आलोय; तुमच्या फोनची जोडणी करण्यासाठी. रिसिव्हर ठेवा. मी फोन चालू करुन देतो."

गण्या आणि मन्या एके ठिकाणी जेवणाच्या पंक्तीत जाऊन जेवायला बसतात. वरणभातावर तूप वाढणारी व्यक्ती विचारते, तुम्ही कोण ?
गण्या : मी मुलाकडून आलोय.
मन्या : मी मुलीकडून आलोय.
वाढणारी व्यक्ती : अरे मूर्खांनो ! हे लग्नाचं जेवण नाही, तेराव्याचं जेवण आहे, उठा !

गुरुजी : बंड्या , हॉस्पीटलमधल्या + या चिन्हाचा अर्थ सांग पाहू.
बंड्या : गुरुजी उभा आहे तो डॉक्टर आणि आडवा आहे तो पेशंट.

# त्रिकालज्ञानी

उडपी संस्थानचे स्वामी मध्वाचार्य हे वैष्णव संप्रदायी असल्याचे प्रसिध्द होते. त्यांच्या संप्रदायात असा निर्बंध होता, की कोणीही दुसऱ्याने स्पर्श केलेले अन्न खाऊ नये. त्याप्रमाणेच वैष्णव संप्रदायी लोक वागत.

या मध्वाचार्यांच्या कानावर समर्थांची कीर्ती गेली. तेव्हा रामदास हे खरोखरच त्रिकालज्ञानी व पूर्ण संत आहेत असं म्हणतात, ती गोष्ट खरी की खोटी हे पाहून व नीट परीक्षा करुन घेण्यासाठी एका चतुर व चाणाक्ष आचार्यांना त्यांनी रवाना केले. संस्थानाधिपतींकडून ते निघाले तेव्हा त्यांच्याबरोबर थोडी माणसे वगैरे बराच संरजाम होता.

अशा रितीने हे वैष्णव मजल दरमजल करीत चाफळास निघाले. नेहमी नदीकाठी उतरावे. स्नानसंध्यादी कर्म आटोपून स्वहस्ते स्वयंपाक तयार करुन कोणी मनुष्य नाही अशा ठिकाणी बसून भोजन करावे, असा त्यांचा परिपाठ असे.

एके दिवशी नदीवर स्वयंपाक झाल्यावर शाळीग्रामास नैवेद्य समर्पण करुन पाणी आणण्याकरीता नदीच्या पात्रात गेले. परत येतात तो नैवेद्य वाढलेल्या पात्राला एका कुत्र्याने स्पर्श केलेला त्यांनी पाहिला. आता काय करावे? असा मोठा विचार पडला. पुन्हा स्वयंपाक करावा तरी त्रास काही थोडा नाही. न करावा तर उद्या या वेळेपर्यंत अन्न मिळणार नाही; असे संकट प्राप्त झाले. तेव्हा त्यांनी विचार केला, की हे कृत्य कोणीही पाहिलेले नाही.

तेव्हा विष्णुतीर्थ सिंचन करुन तुळशीपत्रासह भोजन करावे म्हणजे झाले, असा निर्णय करुन त्याप्रमाणे त्यांनी भोजन केले.

नंतर काही दिवसांनी ते चाफळास येऊन पोचले. समर्थांचे दर्शन घेतले व मध्वाचार्यांकडून आणलेले पत्र पुढे ठेवले. मुद्रांकित असे मध्वाचार्यांचे पत्र पाहून प्रत्यक्ष दर्शन झाल्याप्रमाणे समर्थांनी त्यास वंदन केले आणि वाचून पाहिल्यावर प्रेमानंद झाल्याचे दर्शवून आलेल्या शिष्यांना स्नान करण्यास सूचना केली. तेव्हा आचार्यांनी सांगितले, "आम्ही वैष्णव संप्रदायी आहोत. दुसऱ्याने केलेल्या स्वयंपाकाचे भोजन करीत नाही."

हे ऐकून समर्थांनी दिवाकर भटजींकडून त्यांना भोजनाचे सर्व साहित्य आणून दिले. ते घेऊन शिष्यांनी स्नान वगैरे करुन स्वयंपाक तयार केला. त्या दिवशी समर्थांनी आत जाऊन सांगितले, "सर्व पाने वाढावीत. तूप मात्र वाढू नये. ते आम्ही स्वतः वाढू."

त्याप्रमाणे सर्व पंक्तीची पाने वाढून तयार झाली. आचार्यांनीही आपले पान वाढून घेतले. इतक्यात समर्थांनी एका हातात द्रोण व एका हातात तुपाचे भांडे घेऊन तूप वाढायला घेतले.

प्रथमच आचार्यांच्या पानापाशी जाऊन त्यांच्या पानावर द्रोण ठेवून त्यांत तूप ओतले. मग काय विचारावे? ज्या वैष्णवांना भोजनामध्ये दुसऱ्याची नजरसुध्दा खपत नाही, त्यांना परक्याचा स्पर्श झाल्यावर तर काय आटोपलेच. तीच अवस्था येथे झाली. आचार्यांनी आपली मुद्रा थोडी क्रुध्द करुन म्हटले, "या अन्नाचे आम्ही आता भोजन कसे करावे? दुसऱ्याने स्पर्श केलेले अन्न आम्ही भक्षण करीत नाही."

समर्थ म्हणाले, "आम्हीही वैष्णव नाही काय?"

आचार्य म्हणाले, "आपणही वैष्णव आहात. पण मान्यता असलेले वैष्णव नाही. म्हणून आम्ही भोजन करणार नाही." असे म्हणून ते पानावरुन उठले. ते पानावरुन उठताच समर्थांनी आपल्या हातातील तुपाची तपेली खाली ठेवली आणि रडू लागले. हा प्रकार पाहून कल्याणस्वामी वगैरे मंडळी जवळ आली आणि म्हणाली, "आपण कष्टी का होता? आचार्यांना आम्ही साहित्य देतो. ते पुन्हा स्वयंपाक करतील, काळजी नसावी."

समर्थ रडत म्हणाले, "ते सर्व होईल. पण माझा देह केवढा अपवित्र!"

कल्याणस्वामी म्हणाले, "आपण काही खेद करु नये. मी सर्व तजवीज करतो."

समर्थ म्हणाले, "माझा देह कुत्र्यापेक्षाही वाईट आहे हो. म्हणून मला वाईट वाटते." इतर मंडळींनी अनेक प्रकारची समजूत केली. परंतु कुत्र्यापेक्षाही मी नीच या वाक्याची आपली पुनरावृत्ती चालूच. तेव्हा कल्याणांनी विचारले, "आपण, कुत्र्यापेक्षा नीच म्हणता हे काय आम्हाला समजत नाही."

समर्थ रडत रडत म्हणाले, "ते आचार्यांनाच विचारा."

आचार्य हा सर्व प्रकार पाहातच होते. त्यांच्या मनाला सर्व खूण पटली व स्वामी त्रिकालज्ञानी आहेत, अशी त्यांची खात्री झाली. त्याबरोबर उठून त्यांनी समर्थांच्या चरणी मस्तक ठेवले आणि "सर्व अपराधांची क्षमा असावी. मी भोजन करतो," असे म्हणाले. तेव्हा समर्थही उठले आणि सर्वांनी आनंदाने भोजन केले. नंतर हळूहळू मार्गामध्ये झालेल्या कुत्र्याचा प्रकारही सर्वांना कळलाच. बरेच दिवस त्यांना ठेवून घेतले. जाताना सत्कार करुन समर्थांनी आचार्यांना निरोप दिला. बरोबर मध्वाचार्यांना उत्तरही लिहून दिले. आचार्यांनी निघताना समर्थांना एकांतात विनंती केली, "कुत्र्याचा प्रकार मध्वाचार्य स्वामींच्या कानापर्यंत न जावा."

समर्थ हसले व म्हणाले, "त्याची काही काळजी करु नये."

नंतर आचार्यांनी जाऊन मध्वाचार्यांना सांगितले, की रामदास हे त्रिकालज्ञानी पूर्ण संत आहेत यात शंकाच नाही. पुढे समर्थ रामेश्वराच्या यात्रेला गेले तेव्हा मध्वाचार्यांनी त्यांना उडपीस नेऊन पंधरा दिवस ठेवून घेऊन, त्यांचा मोठा आदरसत्कार केला.

❍ क्रमशः



# किट्टी

चित्रांकन व लेखन : अजय कालडा




मी तर चालले बाहेर. मला घरात फार उकडतंय. अच्छा आई! बाय!
मी एखाद्या स्विमिंग पूलच्या जवळ जाऊन बसते. तिथे पाणीदेखील असेल आणि थंडावादेखील.
अरे इथे किती छान वाटतं आहे. मी आता फोन करुन मोंटू, गोली आणि चिंटूला बोलावून घेते.



तुम्ही सारे स्विमिंग पूलजवळ याल का ? इथं छान गारवा आहे.
हो ! आम्ही देखील तिथं येतो. आज आपण सर्व मिळून खूप मजा करुया आणि खेळायचा आनंद लुटूया.
किट्टी, आम्ही सर्वजण आलो.
अरे हो, इथं तर खरंच फार छान वाटतंय.
आपण सर्वजण मिळून बॉल-बॉल खेळूया.
हो, हो. चला खेळू या


अरे बॉल तर पाण्यात गेला.
अरे ह्यात घाबरण्यासारखं काय आहे. मला पोहता येतं. मी आता बॉल पाण्यातून काढून बाहेर आणते.
हे घ्या. आला बॉल
अरे व्वा! किट्टी तू तर फारच हुशार आहेस.
ह्यात हुशारी दाखविण्यासारखं काय आहे. आपल्याला सगळी कामं करता आली पाहिजेत. कदाचित कुठल्याही वेळी कोणत्याही कामाची गरज भासू शकते.
आपणदेखील सगळ्यांनी पोहायला शिकायचं.
तुम्ही सर्वजण कोल्ड्रींग पिणार ?
हो, हो, का नाही!
किट्टी, आज खरोखरच फार मजा आली. आज आपण खूप खूप खेळलो आणि पोहायलाही शिकलो.

# नांदेड

मुख्यालय : नांदेड

तालुके : नांदेड, मुदखेड, अर्धापूर, भोकर, उमरी, कंधार, लोहा, किनवट, मुखेड, माहूर, हदगाव, हिमायन नगर, देगलूर, बिलोली, धर्माबाद, नायगाव (खेटगाव)

नद्या : गोदावरी प्रमुख नदी, आसना, सरस्वती, मांजरा, सीता

प्रमुख शेतकी उत्पादने : ज्वारी, गहू, बाजरी, तूर, मूग, कापूर, हरभरा, ऊस, केळी

धरणे : मन्याड नदीवर वरवंट, कयाधू नदीवर मनाठा व केदारनाथ

## विशेष माहिती :

❒ महाराष्ट्रातील साडेतीन पीठांपैकी माहूर हे मुख्य पीठ नांदेड जिल्ह्यात आहे.

❒ नांदेड जिल्ह्यातील लोहा तालुक्यातील माळेगाव येथे दरवर्षी मल्हारी म्हाळसाकांतच्या मंदिरासमोर भव्य यात्रा भरते. यात्रेत घोडे, उंट, गाढवांच्या खरेदी-विक्रीची विक्रमी उलाढाल होते. दक्षिण भारतातील सर्वात मोठी यात्रा म्हणून माळेगाव यात्रेची ख्याती आहे.

❒ केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या सेवेत प्रवेश करणाऱ्या उमेदवारांना प्रारंभिक प्रशिक्षण देण्यासाठी मुदखेड येथे केंद्रीय राखीव पोलीस दल प्रशिक्षण महाविद्यालय कार्यरत आहे.

❒ अखिल भारतीय स्तरावर १९८९ साली मान्यता मिळालेली लाल कंधारी जनावरांचे उगमस्थान कंधार तालुक्यात मन्याड खोऱ्यात आहे. ही जात शेती व दुग्धोत्पादकतेसाठी सुध्दा वापरली जाते. लाल कंधारी गुरांचे संवर्धन केंद्र मौजे गऊन ता. कंधार येथे महाराष्ट्र शासनाने स्थापन केले आहे.

❒ नांदेड जिल्ह्यात लमाण, कोलम ह्या जमाती आढळतात.

❒ नांदेड - गोदावरी नदीकाठी वसलेले जिल्ह्याचे मुख्य ठिकाण, विमानतळ व दूरदर्शन केंद्र, नृसिंह मंदिर, शिखांचे दहावे गुरु गोविंदसिंहजी यांच्या स्मरणार्थ बांधलेला प्रसिध्द गुरुद्वारा, हातमाग व यंत्रमाग, कापूस संशोधन केंद्र, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ.

❒ इस्लामपूर - सहस्त्रकुंड धबधबा (पैनगंगा नदीवर)

❒ नेरळी - कुष्ठरोग्यांसाठी नंदनवन हे कुष्ठधाम येथे आहे.

❒ कंधार - येथून जवळच वरवंट येथे मन्याड नदीवर मानार धरण आहे. शांतीघाट बहादरपुरा येथे पंडित नेहरु वनोद्यान आहे. प्राचीन किल्ला कंधार येथे आहे.

❒ अर्धापूर - केशवराज मठ व हेमाडपंती मंदिर

❒ उनकेश्वर - गरम पाण्याचे झरे

❒ बिलोली - येथील जुन्या मशिदीवरील साखळ्या व घुंगरांचे काम पाहण्यासारखे आहे.

❒ किनवट - सागवान लाकडासाठी प्रसिध्द, जवळच पैनगंगा अभयारण्य.

❒❒❒

कवीता : धनश्री अनंता पाटील (मलकापूर, बुलढाणा)

# आला आला पाऊस आला


आला आला पाऊस आला
बघा बघा हो आला आला
पाऊस आला पाऊस आला ।।ध्रु।।

विजांचा लखलखाट
ढगांचा गडगडाट
सोसाट्याचा वारा आला ।।१।।

पक्ष्यांचा किलबिलाट
पाण्याचा खळखळाट
सळसळत झाडातून आला ।।२।।

पावसात मुले भिजती
होड्या पाण्यामध्ये सोडती
आनंदाच्या या घडीला ।।३।।





कथा : नितीन ल. घुरुप (माणगाव-रायगड)

# डायरीने स्वभाव बदलला

चीनू खूपच खोडकर मुलगा होता. दरदिवशी कोणी ना कोणी त्याच्याबद्दल घरी तक्रार घेऊन येत असत. अशा या नेहमीच्या खोड्यापायी त्याला शाळेतूनही काढून टाकले होते. त्यामुळे चीनूच्या आईवडिलांना चीनूच्या भविष्याविषयी चिंता वाटत होती. ही गोष्ट चीनूच्या आईवडिलांनी गावातील एका साधू महाराजांना सांगितली. महाराजांनी त्यांना, चीनूला सुधारण्याचे वचन दिले.

ते चीनूला म्हणाले, "चीनू, आजपासून मी तुला शिकवणार आहे." चीनू म्हणाला, "चालेल पण एका अटीवर. तुम्ही मला जास्त उपदेश करायचा नाही, रागवायचं नाही. मी दिवसभर हिंडेन व संध्याकाळी तुमच्याकडे शिकायला येईन. चालेल ?"

महाराज म्हणाले, "चालेल, पण माझीही एक अट आहे. तू दिवसभरात जे करशील ते या डायरीत लिहून मला संध्याकाळी दाखवायचं,

कबूल!” चीनू म्हणाला, “कबूल.” डायरी घेऊन चीनू घरी आला. दुसऱ्या दिवशी सकाळी चीनू उठला. मस्ती करायला बाहेर पडला. वाटेत किसन काकांचा गोठा लागला. गोठ्यात एका गाईच्या वासराला गवत चारा टाकून किसन काका दिवसभराच्या कामासाठी शेतात निघून गेले होते. चीनूने एका लांब काठीने त्या वासराच्या पुढ्यातील चारा रस्त्यात पसरवून टाकला. त्यामुळे वासरु उपाशी राहिले. पण चीनूला त्याचे काय? तो पुढे निघाला. पुढे त्याला काही लहान मुले चेंडू खेळताना दिसली. त्याने चेंडू हिसकावून घेतला व विहिरीत टाकून दिला. मुले रडू लागली. नंतर तो शाळेत गेला. शाळेचे म्हातारे शिक्षक जोशी सरांचा चष्मा टेबलावर होता. ते बाहेर कुठेतरी गेले होते. चीनूने पेपरवेटने त्यांचा चष्मा फोडून टाकला. जोशी सरांकडे नवीन चष्मा घेण्यासाठी पैसेच नव्हते. त्यांना खूपच वाईट वाटले.

संध्याकाळ झाली. चीनूला साधूमहाराजांनी डायरी लिहायला सांगितल्याची आठवण झाली. तो डायरी लिहिण्यास बसला. तेव्हा आपण केलेल्या खोड्यांनी किसनकाकांचे वासरु उपाशी राहिले, मुलांचा खेळ बंद पडला आणि जोशी सरांना दिसेनासे झाले हे सारे आठवले. त्याला खूप वाईट वाटले. तो धावतच आईकडे गेला व तिच्या कुशीत शिरुन रडू लागला. त्याने यापुढे कोणालाही त्रास न देण्याचे आईला वचन दिले. त्याऐवजी सर्वांना मदत करायचे त्याने ठरविले. चीनूच्या आईला चीनू सुधारल्याचे पाहून खूप आनंद झाला.

❐❐❐



# आकाश दाटले मेघांनी

आकाश दाटले मेघांनी
चहुकडे अंधार पसरला
आला पाऊस आला ।।ध्रु।।

सोसाट्याचा सुटला वारा
पडू लागल्या पाऊस धारा
प्रसन्न झाली धरती
मातीचा सुगंध सुटला ।।१।।

पावसात या आनंदाने
झाडे वेली डोलू लागले
बागडती पाणी उडवती
पावसातही तशी मुले
पाण्याचा पूर लोटला ।।१।।

खांद्यावर अवजार घेऊनी
तयार झाले शेतकरी
हातामध्ये कासरा धरुनी
जोडी बैलांची खिलारी
सुखविण्या जगताला
आला पाऊस आला ।।२।।

कवीता : सुरेश तिर्लोटकर



कथा

# फुलांचं भांडण

राजू नावाचा एक गोड मुलगा होता. त्याला फुलं खूप आवडायची. वेगवेगळ्या रंगांची, वासाची, आकाराची! त्याची ही आवड बघून त्याच्या आईने घरासमोर एक छान बाग तयार केली होती. राजूने तिथे वेगवेगळी फुलं लावली होती. बाग नेहमी छान छान फुलांनी बहरलेली असायची.

राजूच्या आजीचा वाढदिवस होता. पंचाहत्तरावा! त्याला आजीला वाढदिवसाची भेट म्हणून काहीतरी खास आणि वेगळं द्यायचं होतं. त्याने विचार केला, मी आजीला फुलांची भेट दिली तर? किती छान वाटेल तिला! ठरलं मग, मी आजीला फुलांची भेट देणारच!

लगेचच तो बागेत पोहोचला. यातली कुठली

फुलं निवडायची? आजीला कुठली फुलं आवडतील? राजू बिच्चारा गोंधळून गेला होता. तेवढ्यात काहीतरी खुसफूस ऐकू आली. राजू मलाच निवडणार. कारण मी फुलांचा राजा आहे. नाही. तो मलाच निवडणार. कारण माझा वास आजीला आवडतो. तो मलाच भेट म्हणून देईल. कारण मी दिसायला सुंदर आहे.

हे आवाज कुठून येतायत म्हणून, राजू इकडे तिकडे बघू लागला. पण त्याला तिथे कोणीच दिसेना. तेवढ्यात गुलाब त्याला म्हणाला, राजू तू मला घेऊन चल. तुझ्या आजीला मी नक्की आवडेन.

अरे बापरे! ही फुलं बोलत आहेत की काय माझ्याशी? राजू आश्चर्याने म्हणाला. अरे हो. आम्हीच बोलतोय तुझ्याशी! गुलाब म्हणाला, अरे आमच्यापैकी प्रत्येकाला असं वाटायचं की तू आम्हालाच निवडावंस, गुलाब राजूला सांगत होता.

पण तू मलाच निवड! कारण मी फुलांचा राजा आहे. गुलाब मोठ्या तोऱ्यात म्हणाला.

प्राजक्त त्याचं छोटुसं नाक उडवत म्हणाला, हं. राजा म्हणे! राजू तुला जर वेगळं आणि विशेष असं काही द्यायचं असेल ना आजीला, तर तू माझी निवड कर. माझी फुलं नाजूक असतात. माझा वास मंद आणि हवाहवासा असतो.

त्यावर मोगरा म्हणाला, राजू तू प्राजक्त अजिबात निवडू नकोस. कारण त्याची फुलं लवकरच सुकून जातात. त्यापेक्षा तू मला निवड. माझ्या फुलांचा गजरा करुन तू आजीला दे.

त्यापेक्षा तू मलाच का निवडत नाहीस? सदाफुली म्हणाली.

राजूने विचारलं, मी तुला का निवडायचं सदाफुली? तेव्हा ती आत्मविश्वासाने म्हणाली, अरे पण माझा रंग बघ ना! किती छान आहे. गुलाबीसर असा हा रंग कुठल्याच फुलाकडे नाही. माझ्या फुलांचा आकार बघ! तुझ्या आजीला नक्की आवडेल मी.

तेवढ्यात ब्रह्मकमळाने विचारलं, राजू तुझी आजी रोज देवळात जाते मग तू मलाच निवड. कारण देवांना मी फार आवडतो. माझ्यासारखं मोठं फूल कोणाचच नाही बघ. मी ह्यांच्यात मोठा आहे ना!

देवांना आवडतो म्हणे! तोंड पाहिलंय का आरशात? मीच देवांना आवडतो म्हणून माझं नाव देवावरुन ठेवलं. देवचाफा म्हणतात मला! देवचाफा ब्रह्मकमळाला चिडवत म्हणाला.

फुलांचं हे भांडण सुरु असताना राजूला दुरुन बारीक आवाज ऐकू आला. ए राजू, मला चल ना घेऊन!

अं... हे कोण बोललं? राजूने सगळ्या फुलांकडे बघितलं. पण त्याला कोणीच बोलताना दिसेना. अरे इकडे बघ राजू. जमिनीवर बघ. राजूने जमिनीवर पाहिलं तर काय, बकूळ त्याच्याशी बोलत होतं. मी बकूळ. मी सुकल्यानंतरही माझा वास टिकतो. तू मलाच घेऊन चल! बकूळाने जमिनीवर पडल्या पडल्या सांगितलं.

फुलांचं हे भांडण बघून राजू खूपच गोंधळला होता. मग त्याने युक्ती लढवली. एका नक्षीदार फुलदाणीत सगळ्या फुलांची छान सजावट करुन ती आजीला भेट म्हणून दिली.

सगळ्या फुलांचा एकत्र केलेला तो गुलदस्ता आजीला खूपच आवडला. आजी म्हणाली, बाळ राजू! या फुलांसारखंच तुम्ही सारी भावंडं एकत्र खेळा, एकत्र राहा. यातच शोभा आहे.

# सामान्य ज्ञान



१) राष्ट्रकूल क्रीडास्पर्धेत सुवर्णपदक मिळवणारी पहिली महिला खासदार कोण ?

अ) पी.टी. उषा  ब) मेरी कोम  क) स्मृती इराणी  ड) ममता बॅनर्जी

२) शिवरायांनी मुरुंबदेवाच्या डोंगरावर कोणता किल्ला बांधला ?

अ) रायगड  ब) प्रचंडगड  क) तोरणा  ड) राजगड

३) भारताचा राष्ट्रीय खेळ कोणता ?

अ) क्रिकेट  ब) फुटबॉल  क) हॉकी  ड) खो-खो

४) संत एकनाथांनी लिहिलेला काव्यप्रकार कोणत्या नावाने प्रसिध्द आहे ?

अ) भारुडे  ब) श्लोक  क) पदे  ड) भूपाळी

५) इंग्लिश खाडी पोहणारी पहिली भारतीय महिला कोण ?

अ) खचेंद्री पाल  ब) आरती शहा  क) मेरी कोम  ड) सायना नेहवाल

६) रायगड जिल्ह्याचे मुख्य ठिकाण कोणते ?

अ) महाड  ब) माणगाव  क) अलिबाग  ड) कर्जत

७) १ मे १९८१ रोजी कोणत्या जिल्ह्याची निर्मिती झाली ?

अ) रायगड  ब) रत्नागिरी  क) ठाणे  ड) सिंधुदुर्ग

८) कोणत्या नदीच्या खोऱ्यास 'संतांची भूमी' असे संबोधले जाते ?

अ) गोदावरी  ब) कृष्णा  क) कावेरी  ड) चंद्रभागा

९) महाभारतात पांचाली म्हणून कोणती स्त्री ओळखली जाते ?

अ) द्रौपदी  ब) कुंती  क) उत्तरा  ड) माद्री

१०) उत्तर गोलार्धातील सर्वात मोठा दिवस कोणता ?

अ) १ जून  ब) ११ जून  क) १५ जून  ड) २१ जून

उत्तरे इतरत्र

पक्षीजगत



# तपकिरी गालाचा सातभाई

हा तपकिरी गालाचा सातभाई, इंग्रजीमध्ये याला ब्राऊन चीकड् फुलवेट्टा असं म्हणतात. हा भारतात सर्वत्र आढळतो. याबरोबरच हा दक्षिण पूर्व आशिया खंडात आढळतो. याच्या अनेक प्रजाती दिसून येतात. हा पक्षी स्थलांतर करत नाही. बहुदा, निसर्ग जे काही देतो त्यावरुनच हा पक्षी कुठे राहणार, काय करणार हे कळतं. या निसर्गानियमानुसारच या पक्ष्याला तोकडे पंख लाभल्याने हा जास्त लांबवर उडू शकत नाही आणि म्हणूनच याला स्थलांतर करता येत नाही.

हा साधारण १५ सेंटीमीटर लांबीचा पक्षी आहे. डोक्याकडील भाग राखाडी रंगाचा असलेल्या या पक्ष्याची पाठ तपकिरी रंगाची असते. तर चेहऱ्यावरील भागही तपकिरी असतो. यामुळेच याला तपकिरी गालाचा सातभाई असं म्हणतात. याची लंब व टोकाला निमुळती होत जाणारी शेपटी ही याची मुख्य ओळख आहे. इतर सातभाई पक्ष्यांप्रमाणे हा समूहात राहत नाही. मात्र हा पक्षी कायम जोडीने फिरतो. तसेच याची जोडी कायम एकच असते.

दमट हवा असणाऱ्या भागात, सदाहरित घनदाट जंगलात तसेच बांबूच्या वनात हा आढळतो. हा माणसांच्या सान्निध्यात रमणारा असल्याने मनुष्यवस्तीतही आढळतो. विशेषतः फळबागा, शेतीचा प्रदेश व उद्यानांमध्ये हा हमखास आढळतो.

बारीक किडे, कीटक, फळं, बिया, गवताचे दाणे हे पक्ष्याचं मुख्य खाद्य आहे. यामुळेच पालापाचोळ्याखालील किडे खाताना हा हमखास आढळतो.

जुलै ते सप्टेंबर हा याचा प्रजनन काळ असतो. या काळात नर व मादी मिळून घरटं तयार करतात. याचं घरटं झाडावर दाट पानाखाली लपल्यासारखं असतं. पानं, शेवाळं, मुळांचे तंतू व गवत या साहित्याचा वापर करुन हे घरटं तयार करतात. या घरट्यात मादी दोन ते तीन अंडी घालते. ही अंडी १०-१२ दिवस उबवल्यानंतर पिल्लं बाहेर येतात आणि पंधरा दिवसांनी पिल्लं उडण्यास सक्षम होतात.

❒ संग्राहक : अंकित जाधव



कथा

# शेरास सव्वाशेर

नवापूर गावात चंदूभट नावाचा एक पुजारी राहत होता. चंदूभट गरीब होता. एका झोपडीत राहत असे. झोपडीत प्रसाद तयार करण्याच्या दोन मोठ्या भांड्यांशिवाय मौल्यवान असे काहीच नव्हते. काशीयात्रेला जावे अशी चंदूभटाची अनेक वर्षांची इच्छा होती, ती पूर्ण होण्याचा योग आला. गावातील काही माणसे काशीयात्रेस जात होती, त्यांनी चंदूभटालाही सोबत घ्यायचे ठरविले.

काशीयात्रेला जाताना चंदूभटाने प्रसादाची मोठी दोन भांडी व इतर काही सामान झोपडीतून चोरीस जाईल म्हणून शेजारच्या राधेश्यामच्या घरात ठेवण्यासाठी दिले व तो यात्रेला निघून गेला.

अनेक महिने गेले. चंदूभट यात्रेहून परत आला व त्याने झोपडीची साफसफाई केली. आपली भांडी व इतर सामान आणायला तो राधेश्यामकडे गेला. पण राधेश्यामच्या मनात

लबाडी करण्याचा विचार आला. त्याने चंदूभटाला सांगितले, तुझी भांडी मी घरात ठेवली होता; पण ती उंदरांनी खाऊन टाकली. आता मी तुला ती कशी देऊ? चंदूभटाने राधेश्यामचा खोटेपणा ओळखला; पण तो काही बोलला नाही. गुपचूप निघून गेला. काही दिवसांनी त्याने गंगापूजन केले. सर्वांना जेवायला बोलावले. राधेश्याम आपल्या दहा वर्षाच्या मुलासह आला होता.

चंदूभट म्हणाला, "राधेश्याम, तुझ्या मुलाला राहू दे माझ्याकडे. जरा सोबत होईल मला नदीवर जाताना. संध्याकाळी त्याला मी घरी सोडीन." राधेश्याम मुलाला ठेवून गेला.

चंदूभटाने मुलाला खाऊ देऊन घरात बसवले व संध्याकाळी दु:खी चेहरा करुन राधेश्यामकडे गेला. त्याला म्हणाला, "राधेश्याम, मी आणि तुझा मुलगा नदीवरुन येत होतो तेव्हा एक घार आली आणि तुझ्या मुलाला उचलून घेऊन गेली." राधेश्यामला काही पटेना. पण चंदूभट पुन्हापुन्हा तेच सांगू लागला. राधेश्याम तक्रार घेऊन पाटलाकडे गेला. पाटलाने चंदूभटाला बोलावले व विचारले, "एवढ्या मोठ्या मुलाला घार कशी उचलून नेईल?"

चंदूभट म्हणाला, जर प्रसादाची एवढी मोठी भांडी उंदीर खाऊ शकतात, तर घार मुलाला का उचलून नेणार नाही? हे ऐकताच राधेश्यामचा चेहरा एकदम पडला. पाटलाने सर्व चौकशी केली. राधेश्यामची लबाडी उघड झाली. त्याला चंदूभटाची भांडी परत द्यावी लागली. वर दंड भरावा लागला. पुन्हा कोणालाही फसवायचे नाही अशी त्याने कबूली दिली. लोक म्हणू लागले चंदूभट राधेश्यामला अगदी शेरास सव्वाशेर भेटला.

❒❒❒

# वाचकांचे मनोगत

खूप वर्षापासून मी हसती दुनिया वाचत आहे. हसती दुनिया या मासिकातून खूप काही शिकायला मिळते. त्यातील वेगवेगळ्या प्रकारच्या गोष्टी वाचून चांगला बोध मिळतो आणि शब्दकोडे सोडवून सामान्य ज्ञानही वाढते. याच प्रकारे मासिकातील इतर साहित्य जसे, दोन शब्द, विचारपुष्प, दादाला विचारु या, दिव्यवाणी इ. वाचायला आवडते. हसती दुनिया हे मासिक वाचून मुलांवर चांगले संस्कार घडतात व ते सत्संगाशीही जोडले जातात.

या वेळेस हसती दुनिया वाचताना आदरणीय श्री. राजेंद्र थोरातजी यांनी लिहिलेल्या 'संस्कारदीप' या पुस्तकाची समीक्षा वाचायला मिळाली आणि त्यांच्या 'छोट्या गोष्टी मोठे बोध' तसेच 'संस्कारधन' या पुस्तकांबद्दलही माहिती मिळाली. रविवारी मी चेंबूरला सत्संगाला गेले तेव्हा या तिन्ही पुस्तकांची खरेदी केली. वाचल्यानंतर मन प्रसन्न झाले. ही पुस्तकं म्हणजे ज्ञानाचं भांडार आहे. मे महिन्याच्या सुटीत मुलांना वाचनाची चांगलीच मेजवानी मिळाली.

सोसायटीतील मुलांच्या वाढदिवसाला सुंदर भेट म्हणून देता येईल, अशीच ही पुस्तकं आहेत.

❒ - दिव्या काबाडी (भिवंडी)

# चित्र काढा आणि रंग भरा



## सामान्यज्ञान उत्तरे

१) ब
२) ड
३) क
४) अ
५) ब
६) क
७) ड
८) अ
९) अ
१०) ड

## शब्दकोडे १६७

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| का | का | | ज्यु | रा | सि | क |
| | वे | स्ट | | म | | ळ |
| बे | री | | पं | च | वी | स |
| स | | कि | | रि | | |
| बॉ | | र | ज | त | | कॅ |
| ल | क्ष्म | ण | | मा | टीं | न |
| | | बे | ड | न | | ब |
| द्रौ | प | दी | | स | त | रा |

।। तू ही निरंकार ।।

## वैर - द्वेषाच्या पाडून भिंती
## प्रेमाचे पूल बांधत जाऊया



शंकरराव जाधव
मुखी, वाई तालुका

महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही... एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची खास सोय !



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

**THE COMPLETE FAMILY SHOWROOM**

मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर । लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते

सद्‌गुरू की निगाहे करम एक अगर पड जाये,
मुक्कदर फिरसे लिखने को खुदा मजबूर हो जाये...

सद्‌गुरू होता जग का दाता जो चाहे कर सकता है
पत्थर दिल भी गर पैरों को छुले भवसागर तर सकता है

९९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)

फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2016-2018
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2018
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month


।। तुही निरंकार ।।



जनार्दन एच्. पाटील
झोनल प्रमुख-नाशिक क्षेत्र

ऑफिस : गाळा नं. १,४,६,८ महावीर इंडस्ट्रियल इस्टेट,
नारिंगी फाटा, विरार (पूर्व),
ता. पालघर, जि. ठाणे - ४०१३०५ (महाराष्ट्र)
कार्यालय : (०२५०) २५२७३२०/९८२२८८५५२६
ई-मेल : rajinustries2010@yahoo.in
janardanpatil6500@gmail.com
वेबसाईट : www.vijayaengineeringworks.com
www.rajindustries.net.in

मे. विजया इंजिनिअरींग वर्क्स



मॅन्यु : स्पेशालिस्ट प्लास्टिक
इंजेक्शन मोल्ड आणि ब्लो मोल्ड
(घेर ओरम टाईप डाईज)

मे. राज इंडस्ट्रीज




मॅन्यु. फार्मास्यूटिकल्स कॅप्स (कोलॅप्सीबल आणि लॅमी ट्युब कॅप्स),
पेस्टीसाईड पॅकेजींग, एच.डी. आणि पी.पी. बॉटल



बाबाजी कंस्ट्रक्शन कं.

सिडको आणि सरकारमान्य प्राप्त १ रुम हॉल किचन, २ रुम हॉल किचन
दुकानाचे गाळे तसेच इन्डस्ट्रीअल गाळे कर्ज सुविधांसहित योग्य भावात मिळतील.

जनार्दन हा. पाटील — राकेश ज. पाटील
अंचित रा. पाटील — कुशल रा. पाटील